शनिवार । २४ जानेवारी १९८९ । एक रुपया

# माणूस

## पाटणा....

१७ डिसेंबरच्या दुपारी
बिहार विधानसभेचे
सर्व पुरोगामी सदस्य
ऊर्दूला दुसऱ्या राजभाषेचा
दर्जा देणारे विधेयक
बहुमताने मान्य करून
'वैचारिक दिवाळी'
साजरी करीत होते तर
पाटण्यासकट अन्य
३२ जिल्हा केंद्रातील
जनता याच विधेयकाविरुद्ध
कडकडीत हरताळ पाळीत होती.
पूर्णिया....सरसहा, हाजीपूर,
बिहारशरीफ, भागलपूर....

पृष्ठ ... ५

## दिल्ली....

पीढी–दर–पीढी
कर्ज के बोझसे
दबे रहनेवाले
किसानको
शरद जोशीका
सीधा गणित
समझमें आ गया है ।
अपने उत्पादनोंके वाजिब
दामकी मांग लेकर
उन्होंने न सिर्फ
महाराष्ट्रको, बल्की
दिल्ली तकको
हिला दिया ।
( –नई दुनिया )

पृष्ठ ... ९

# सप्रेम नमस्कार

□ माणूस (१० जानेवारी ८१) मधील श्री. वा. दा. रानडे यांच्या 'कम्युनिझम व स्वातंत्र्य–पोलंडमधील आंदोलनाचे परिणाम' या लेखाच्या संदर्भात हे लिहीत आहे.

पोलंडमधील कामगारांनी, 'कम्युनिस्ट पक्षाहून स्वतंत्र आणि म्हणून कम्युनिस्ट पक्षाच्या सर्व तऱ्हेच्या संघटना स्थापण्यातील मक्तेदारीला, एकाधिकाराला सुरुंग लावून, स्वतंत्र कामगार संघटना स्थापन करण्याचा व संप करण्याचा जो अधिकार पोलंडमध्ये गेल्या काही महिन्यात संपादन केला आहे ही कम्युनिस्ट चळवळीच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे व ती टिकून राहिली तर (असं म्हणण्याचं कारण पोलंडमध्ये होऊ शकणाऱ्या रशियन लष्करी हस्तक्षेपाचा धोका हे होय.) तिचे दूरगामी परिणाम रशियासकट संपूर्ण कम्युनिस्ट प्रस्थापितावर झाल्याशिवाय राहणार नाहीत. पोलंडमधील स्वतंत्र कामगार चळवळीची स्थापना व संभाव्य वाढ हा जो नवा अँन्टी-थिसिस त्या देशात निर्माण होत आहे व त्यातून जे लोकशाहीकरण होणार आहे ही एक अत्यंत स्वागतार्ह घटना आहे. मग हे अधिकार मिळण्यापूर्वीचे कम्युनिस्ट जग इतिहासजमा झालेले असेल. याचीच पुढची पायरी म्हणजे कम्युनिस्ट पक्षाच्या सर्व क्षेत्रातील एकाधिकाराचा नव्याने विचार करण्याच्या दिशेने कम्युनिस्ट जग अपरिहार्यपणे वाट चालेल. "आमच्या कम्युनिस्ट व्यवस्थेला हात लावू नका" अशा सुरातील मागणी कम्युनिस्ट प्रस्थापिताने करणे व कामगारांकडून तसे आश्वासन मिळविणे यातून कम्युनिस्ट प्रस्थापिताचे भीतिग्रस्त मनच व्यक्त होते. कामगारांचा–लोकांचा या प्रस्थापिताला धाक, दरारा वाटावा हा पोलिश लोकांचा मोठा विजय आहे. या सर्व घटना आणि त्यातील भवितव्यता या गोष्टी न्यायप्रेमींना जगभर उल्हसित करतील.

आपल्याकडे दुर्दैवाने कामगार संघटनांनी पोलिश कामगारांच्या विजयाची पुरेशी दखल घेतलेली नाही. इथल्या सर्व क्षेत्रातील कामगार संघटनांनी पोलिश कामगारांच्या विजयाचे अभिनंदन करणारे ठराव संमत केले पाहिजेत व ते पोलिश कामगारांच्या 'सॉलिडॅरिटी' या स्वतंत्र कामगारसंघटनेकडे धाडले पाहिजेत. इथल्या डाव्या–उजव्या कम्युनिस्ट पक्षांनी पोलिश कामगार चळवळीच्या यशाच्या बाबतीत मिठाची गुळणी धरली आहे. अशा तऱ्हेचे ठराव व्हावेत अशी मागणी झाल्यावर या पक्षांना आपले मौन सोडून या प्रश्नांवर काही बरी–वाईट भूमिका घेणे भाग पडेल.

१२ जानेवारी — म. मो. पेंडसे

□ आपले १० जानेवारी १९८१ चे साप्ताहिक माणूसमधील पृष्ठ क्रमांक ६ वरील प्रा. गोपाळ दत्त कुलकर्णी यांचा 'सावित्री महाराष्ट्र जागवून गेली' हा लेख कृपया पहावा.

उपरोक्त लेखातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये सावित्रीबाईंनी वयास २० वर्षे होण्यापूर्वी १८४८साली भारतातील पहिली मुलींची शाळा चालविली असा उल्लेख केला आहे; परंतु खरी वस्तुस्थिती अशी आहे की, भारतातील पहिली हिंदू मुलींची शाळा कलकत्ता येथे अमेरिकन मिशनने १८१९ साली सुरू केली. तसेच सावित्रीबाई फुले यांनी हिंदू मुलींची शाळा १८४८ साली सुरू केलेली नसून मार्च १८५१ साली सुरू केली. हे आपणास कळविण्याचे कारण की सावित्रीबाईंनी केलेल्या कार्याचा मान ठेवून कोणाचाही वरील माहितीच्या आधारे गैरसमज होऊ नये व माहितीचा विपर्यास होऊ नये. म्हणून चुकीची दुरुस्ती माणूस अंकात होणे आवश्यक आहे. असे म्हणता येईल की सावित्रीबाई फुले या भारतीय स्त्रीने हिंदू मुलींची १ ली शाळा भारतात मार्च १८५१ साली सुरू केली. यामुळे सावित्रीबाईंनी केलेल्या कार्याचा यथोचित गौरव होऊनही वस्तुस्थितीचा विपर्यास होणार नाही.

११ जानेवारी — भा. ह. भाटे, ठाणे.

## आपण रशियाला काय देऊ शकतो?

□ गंभीर लिखाण वाचावयाचा सोस असलेल्या वाचकांना ठाऊक आहेच की, रशियातील नामवंत लेखक–कवी पॉपॉवस्की,


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : चौतिसावा

२४ जानेवारी १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

स्लेन्युत्सेव, सिन्नरोनेस्की आणि इतर काही की ज्यांची नावे आपणास नीट उच्चारता येत नाहीत, हे बंडखोर विचारांबद्दल रशियन सरकारच्या मर्जीतून उतरले आहेत. प्रस्थापित सत्तेविरुद्ध लिखाण करणे, परदेशातून ते छापून आणणे, बक्षिसे मिळविणे यामुळे सेंट्रल पॉलिटब्यूरोच्या अनेक ज्येष्ठ सभासदांची झोप उडाली आहे असे कळते. आपण दुसऱ्यास भौतिक गोष्टी देऊ शकलो नाही तरी पूर्वजांच्या वैचारिक वारश्यावर जगाला योग, अहिंसा, मानसिक शांती इत्यादी मुक्त हस्ताने देऊ शकतो व हवा-नको असलेला सल्लाही देऊ शकतो. आपल्या देशाची व रशियाची मैत्री लक्षात घेता आपण त्यांना या बाबतीत मदत करणे आपले कर्तव्य ठरते.

यासाठी आपल्या सामाजिक व्यवस्थेचे इंगित पाहिले पाहिजे. जे जे वेगळेपण असेल ते आमच्या चौकटीत सामावून घेणे हे ते रहस्य. म्हणजे असे की, चार्वाकासारखा प्रचंड नास्तिक झाला तेव्हा त्याला तुरुंगात वगैरे 'न टाकता त्याचे दर्शन गुरुकुलाच्या अभ्यासक्रमात घातले. त्यामुळे झाले काय तर कोणीही ते फार गंभीरपणे घेतले नाही व चौकटीला धक्का बसला नाही. दुसरे उदाहरण अनादिकालापासून सर्व समाजात वेश्या आहेतच. आम्ही त्यांची देवदासी म्हणून व्यवस्था लावली. प्रश्न सुटला.

आमच्या राज्यकर्त्यांनी गेल्या ३०–४० वर्षात हे तंत्र आणखी विकसित केले आहे. सामाजिक अन्यायाविरुद्ध तळमळीने लिहिणारे, पोटतिडिकेने लिहिणारे, अश्रू, घाम, रक्ताने लिहिणारे अनेक लेखक, कवी या काळात निर्माण झाले. आता खरे म्हटले तर रशियन पॉलिटब्यूरोच्या सदस्याप्रमाणे आमच्या मंत्र्यांची झोप नाहीशीच व्हावयास पाहिजे होती. आपण असे काही ऐकले आहे का ? अर्थात नाही. याचे कारण म्हणजे या सर्व बंडखोरांची नीट व्यवस्था लावण्यास आपण मिळविलेले यश. या सर्व लोकांना रशियाप्रमाणे तुरुंगात घालावयाचे म्हणजे केवढा खटाटोप व खर्च झाला असता ! पण तसे आपण मुळीच केले नाही. हे लिखाण खुशाल प्रसिद्ध होऊ दिले. लेखक, कवी यांची मुख्य उबळ अशी की, आपला शब्द छाप्यात यावा. ही पुरी झाली की, निम्मे काम होते. राज्यकर्ते, साहित्यिक वैचारिक संमेलनात मधून मधून डोकावतात. कोणाच्या तरी पाठीवर थाप मारून, लिखाणाने अस्वस्थ झालो असे म्हणतात, राज्य पुरस्कार देवव-तात. त्यामुळे विरोध संपतोच. बंडखोर लेखक चौकटीत बसतो. होते काय, लेखक लिहितात, लोक नजर टाकतात व सर्व नद्या सागरास मिळतात त्याप्रमाणे या सर्व गोष्टी रद्दीवाल्याकडे जातात. आपली झोप खराब करणे हे शहाण्या राज्यकर्त्यांना करावे लागत नाही.

ही स्ट्रॅटेजी किती यशस्वी आहे याचा किस्सा असा. एकदा विधानसभेत विरोधी पक्षाच्या आमदारानीच संबंधित मंत्र्याच्या अनागोंदी कारभारावर भयानक टीकास्त्र सोडले. भाषण संपताच मंत्रीमहाशय उठले व शांतपणाने म्हणाले, 'मी या आमदाराच्या मताशी शंभर टक्के सहमत आहे.' संपलेच. असे सांगतात की, त्या भाषण करणाऱ्या आमदारालाच स्ट्रेचरवरून न्यावे लागले !

तेव्हा रशियन साहेबानी हे तंत्र नीट समजावून घेतले तर त्यांची झोप त्याना परत मिळेल. अगदी सोप्या गोष्टी आहेत या. पोटतिडिकीने लिहिलेले लिखाण गुळगुळीत वेष्टणांच्या पुस्तकात छापावे व दास कॅपिटालसारख्या ग्रंथाच्या बरोबरीने विकावयास ठेवावे. मधून मधून अशा लेखकाच्या पाठी थोपटाव्यात, पुरस्कारही द्यावेत. शेवटी वाचक अशा लिखाणाचे काय करावयाचे ते करत असतातच. राज्यकर्त्यांनी खुशाल झोपावे !

१० जानेवारी, ८१ — प्र. खं. कुलकर्णी, पुणे.

पुणे वार्ता

# कविता दशकाची । ग्रंथाली चर्चासत्र
# संग्रह प्रातिनिधिक नाही; सामाजिकतेचा अभाव

१८ जानेवारी. पुण्यातल्या फर्ग्युसन कॉलेजमधला एक वर्ग. अँफी थिएटरजवळचा. सर्कशीच्या तंबूतल्या गॅलरीसारखा. पायरी-पायरीने चढत जाणारा. आज या ठिकाणी रविवार असूनही पन्नास-पाउणशे मंडळी जमली होती. 'ग्रंथाली 'तर्फे प्रकाशित झालेल्या ' कविता दशकाची ' या काव्यसंग्रहावर चर्चा करण्यासाठी. त्यात प्राध्यापक होते, समीक्षक होते, विद्यार्थी होते आणि ज्या कवींच्या कविता संग्रहामध्ये आहेत ते कवीही हजर होते.

एकोणिसशेसत्तरच्या आगेमागे लिहू लागलेले आणि येत्या दशकामध्ये प्रभावी होऊ शकतील अशा दहा कवींच्या एकूण शंभर कविता या संग्रहात आहेत आणि हे कवी आहेत– दे. भा. धामणस्कर, र. कृ. जोशी, गुरुनाथ सामंत, रजनी परुळेकर, हेमंत जोगळेकर, उत्तम कोळगावकर, नारायण कुलकर्णी, कवठेकर, वसंत पाटणकर, अशोक बागवे आणि अनिल द्रविड. यांपैकी अनिल द्रविड वगळता बाकी सर्व कवी चर्चासत्राला आवर्जून उपस्थित होते. डॉ. गं. ना. जोगळेकर, प्रा. स. शि. भावे, प्रा. चारुदत्त भागवत, प्रा. अजय आरोस्कर, डॉ. द. दि. पुंडे, मो. म कुलकर्णी, प्रा. अ. के. भागवत, प्रा. प्र. ना. परांजपे, प्रा. गोविंद जोशी, प्रा. राम बापट इत्यादी प्राध्यापक व समीक्षक आणि गिरीश देशपांडे, संध्या गोखले, रेखा इनामदार, अरुणा ढेरे, लीना तक, ज्योती मोकाशी, विकास हुंडे, रवींद्र सरदेसाई, प्रवीण वाळिंबे, माया परचुरे यांच्यासारखी कवितेविषयी आस्था बाळगणारी तरुण मंडळी चर्चासत्रात भाग घेण्यासाठी आलेली होती.

सुरुवातीला ' कविता दशकाची 'चे संयोजक प्रा. प्र. ना. परांजपे यानी प्रास्ताविक केल्यानंतर प्रा. अजय आरोस्कर व प्रा. चारुदत्त भागवत यांनी या काव्यसंग्रहावरची स्वत:ची टिपणं वाचली. प्रा. आरोस्कराच्या टिपणातील बराचसा भाग त्यांनी याच काव्यसंग्रहावर 'माणूस 'मध्ये लिहिलेल्या अभिप्रायाचा होता, तर प्रा. भागवत यानी

स्वतःचे काही ठोस मुद्दे मांडण्यापेक्षा हाती सापडतील त्याची 'नेमाड शैली 'ने खिल्ली उडवण्यातच बराचसा वेळ खर्ची घातला.

यानंतर गटवार चर्चेला सुरुवात झाली आणि तिथून चर्चासत्र रंगायला लागलं. चर्चासत्रासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे तीन गट पाडले. त्यामध्ये फर्ग्युसनबरोबरच पुण्यातल्या इतरही काही कॉलेजांमधले विद्यार्थी होते. या प्रत्येक गटाला तीन-तीन कवी वाटून दिले आणि तीन स्वतंत्र वर्गांमध्ये चर्चा सुरू झाली.

एका गटात श्री. र. कृ. जोशी होते व त्यांनी आपल्या 'दृश्य कविते' च्या संकल्पना स्पष्ट करता करता चर्चेचा बहुतेक ओघ आणि वेळ आपल्याच बाजूला ठेवला. त्याच्या या संकल्पना वादग्रस्त होत्या, त्यामुळे विद्यार्थ्यांनीही त्यांच्यावर प्रश्नाचा भडिमार केला आणि त्यातून काही वेळा तर र. कृ. जोशी बी. एड. चे पाठच घेत आहेत असं चित्र वर्गात निर्माण होऊ लागलं. त्यामुळे उत्तम कोळगावकर आणि नारायण कुलकर्णी, कवठेकर यांच्या कवितांना पुरेसा न्याय मिळू शकला नाही.

दुसऱ्या गटात रजनी परुळेकर आणि वसंत पाटणकर यानी चर्चेची सूत्रं संयुक्तपणे ताब्यात ठेवली व हेमंत जोगळेकरांचा आवाज कायम दबलेला राहिला. कवितेतली प्रतीकं, कारागिरी, अनुभवाचं स्वरूप, निर्मितीप्रक्रिया इत्यादी मुद्द्यावर या गटात चर्चा छान रंगली; पण काही वेळा ती अगदीच प्राथमिक पातळीवर जात होती. विद्यार्थीच ती पुन्हा वर उचलण्याचाही प्रयत्न करत होते आणि रंगवतही होते.

तिसऱ्या गटात गुरुनाथ सामंत, अशोक बागवे आणि द. भा. धामणस्कर हे तिघे जण होते. हा गट मात्र एकूणच कवितेवर चर्चा करण्यापेक्षा तिचा ज्याला जमेल तसा उपभोग घेण्यातच खरा आनंद आहे, या तत्त्वावर श्रद्धा ठेवणारा वाटला.

या तीन्ही गटातले कवी विद्यार्थ्यांनी त्यांच्या कवितांबद्दल मांडलेल्या मतावर प्रतिक्रिया व्यक्त करण्यास, काही वेळा विरोधी मतांचं खंडन करण्यास वाजवीपेक्षा जास्त उत्सुक दिसले. विद्यार्थ्यांनीच प्रश्न विचारले म्हणून उत्तर द्यायचं झालं तरी ते पुनरावृत्ती किंवा ढोबळ विधानाचा गुन्हा करूनही भरपूर बोलत होते. तोंडी लावायला स्वतःच्या एकेक-दोनदोन कविताही जास्तीत जास्त प्रभावीपणे वाचून दाखवण्याचा प्रयत्न करत होते. याचा परिणाम एवढाच झाला की अनेकदा गटवार चर्चेला मुलाखतीचं रूप आलं. शिवाय नंतर जेव्हा कवीना त्यांच्या कविताविषयी निवेदन करण्यास सांगितलं गेलं तेव्हा त्यांच्यापैकी एकाने उठून स्वच्छ विचारलं– 'पण आम्ही निवेदन कोणत्या मुद्द्याबाबत करायचं?' कारण यानी स्वतःच्या कविताबाबतचे बहुतेक मुद्दे गटवार चर्चेत मांडून टाकलेले होते.

दिवसभर चाललेल्या या चर्चासत्राचा प्रा. स. शि. भावे यांनी उत्तम आढावा घेतला. स्वत ची काही मतंही मांडली.

या संग्रहाचं संपादन करणाऱ्या मंगेश पाडगावकर, विजया राजाध्यक्ष, रमेश तेंडुलकर, शिरीष पै आणि दया पवार या संपादकमंडळापैकी फक्त रमेश तेंडुलकर चर्चासत्राला उपस्थित होते. त्यामुळे काव्यसंग्रहातल्या त्रुटीबाबत जेव्हा त्यांच्यावर वाचकानी तोफ डागली तेव्हा श्री. तेंडुलकरांनी काही तरी कंटाळवाणी लांबण लावून 'काही बरं ऐकायला मिळेल' या श्रोत्यांच्या कल्पना धुळीला मिळविल्या.

¤

काव्याविषयी दिवसभर चालवलेल्या मंथनातून काही मुद्दे जोरदारपणाने व वारंवार मांडले गेले. काही मुद्द्यांना नुसता निसटता स्पर्श झाला, तर काही मुद्द्याचा वेळेअभावी विचारही होऊ शकला नाही.

काव्यरचनेमागे कवीची उत्स्फूर्तता किती प्रमाणात असते, हा एक चर्चेमधला सर्वांच्या जिव्हाळ्याचा आणि कुतूहलाचा विषय. यावर उत्तर देताना रजनी परुळेकर आणि वसंत पाटणकर यानी सांगितलं की, 'कोणत्याही कवितेत कारागिरी अपरिहार्य असते. तिच्या प्रमाणात फरक असू शकेल; पण एकदा जी कविता लिहिली, तीमध्ये एका शब्दाचाही बदल केला नाही, हे सांगणं म्हणजे एक तर 'romantic myth' असते किंवा कवीचा दुराग्रह त्यामागे असतो'; पण त्याचे हे मत खोडून काढताना प्रसिद्ध कवी गोविंद जोशी यानी सांगितलं की, 'यापैकी कोणत्याही दोषाच्या आहारी न जाता मी चाळीस चाळीस ओळींच्या कविता एका दमात लिहिलेल्या आहेत आणि त्यामध्ये कोणताही बदल मला प्रामाणिकपणे करावासा वाटला नाही.' चर्चासत्राचा समारोप करताना प्रा. स. शि. भावे यांनी जोशींच्या म्हणण्याला प्रसिद्ध कवी बा. भ. बोरकराच उदाहरण दिलं. ते म्हणाले, 'मंगेश पाडगावकरांकडे आम्ही सर्वजण जेवायला जमलो असताना बा. भ. बोरकर आंघोळीला गेले होते. त्यांच्यासाठी आम्ही जेवायचं थांबलो होतो. त्यामुळे पंधरा–वीस मिनिटांनी पाडगावकरांनी बाथरूमपाशी जाऊन बोरकराना हाक मारली. 'आलोच' म्हणून बोरकर बाथरूममध्ये तब्बल अर्धा तास राहिले आणि स्नान करून बाहेर आले ते तीन कविता रचूनच!'

याच संदर्भात प्रसिद्ध इंग्लिश कवी विल्यम वर्डस्वर्थच्या 'Poetry is a sponteneous overflow of powerful feelings' या सर्वश्रुत वाक्याचाही पुनरुच्चार झाला; पण कवितेचा गाभा वीज चमकावी तसा चमकून गेला तरी भोवतालचा डोलारा उभा करण्यासाठी कवीला कारागिरासारखेच श्रम घ्यावे लागतात, याबाबत बहुतेक कवींमध्ये एकमत दिसलं. आता यामध्ये प्रतिभेचा किंवा क्षमतेचा भाग किती असेल, या मुद्द्याबाबत मात्र बहुतेकांनी सोइस्कर मौन पाळलं.

या दहा कवींनी वापरलेल्या प्रतीकाचाही चर्चासत्रात भरपूर ऊहापोह झाला. अमुक एका कवीने वापरलेली प्रतीकं परंपरावादी, पुराणवादी मनोवृत्ती व्यक्त करणारी आहेत, इथपासून तर अमुक एका कवीची प्रतीकं अतिशय व्यक्तिगत आहेत, इथपर्यंत विविध प्रकारची मतं चर्चेमध्ये व्यक्त झाली. कवितेमध्ये एक मुख्य प्रतीक व त्याच्या अनुषंगाने इतर दुय्यम प्रतीकं अशी ग्रहमालिकेसारखी त्याची रचना असते, असंही मत रजनी परुळेकर व वसंत पाटणकर या कवीनी व्यक्त केलं. कवितेतल्या प्रतीकांबाबतची ही चर्चा चालू असताना मला सारखी एलियटच्या 'द वेस्ट लॅंड' या कवितेची आठवण होत होती. त्या कवितेत या गृहस्थानं इतकी विविध प्रकारची प्रतीकं वापरली आहेत की त्यांची स्पष्टीकरणं देणाऱ्या तळटीपाची लांबी जवळजवळ त्या कवितेइतकीच झाली आहे!

यातूनच कवितेतल्या दुर्बोधतेचा मुद्दा निघाला. वैयक्तिक संदर्भ असलेली किंवा

मलपृष्ठ १ वर

# इंदिरा राजवट

## दोन पर्वांमधील फरक

वा. दा. रानडे

भारतीय प्रजासत्ताकाला येत्या सोमवारी एकवीस वर्षे पुरी होत आहेत. प्रजासत्ताकापुढील आव्हानांचा विचार येथे मुख्यतः गेल्या वर्षातील घटना आणि नव्या वर्षी उपस्थित होणारे प्रश्न याच्या संदर्भात करावयाचा आहे. इंदिरा राजवटीच्या दुसऱ्या पर्वाचे एक वर्ष नुकतेच पुरे झाले. सरकार आणीबाणी आणणार नाही असे आश्वासन पुण्यात पत्रकाराशी बोलताना पंतप्रधानांनी दिले; पण प्रत्यक्षात आणीबाणी आली नाही तरी आणीबाणीची आठवण करून देणाऱ्या काही घटना घडत आहेत. राष्ट्रीय सुरक्षा कायदा सरकारने पास केला. विरोधी पक्षाविरुद्ध या कायद्याचा वापर केला जाणार नाही असे आश्वासन सरकारने कितीही दिले असले तरी मागील अनुभवाने विरोधी नेत्याचा त्यावर विश्वास न बसणे स्वाभाविक आहे. सध्या विरोधी पक्ष एवढे दुबळे आहेत की, पंतप्रधानाना आणीबाणी आणण्याची काहीही आवश्यकता नाही; पण तशी वेळ आलीच तर राष्ट्रीय सुरक्षा कायद्याच्या रूपाने त्यांनी आपल्या हाती शस्त्र सज्ज ठेवले आहे.

'जे सरकार चालवू शकतात त्यांना निवडून द्या' अशी घोषणा देऊन इंदिरा गाधी पुन्हा सत्तेवर आल्या; पण त्या आपली सत्ता परिणामकारक हाताळून देशापुढील एकेक महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावीत आहेत असा अनुभव काही गेल्या वर्षात आला नाही. १९८० च्या पहिल्या सहामाहीत त्याआधीच्या वर्षाच्या तुलनेने औद्योगिक उत्पादनात ३·२ टक्के घट झाली. ऑक्टोबरपासून परिस्थिती सुधारत असल्याचा दावा सरकारतर्फे करण्यात आला. तो काही प्रमाणात खरा मानला तरी समाधान मानण्यासारखी ही प्रगती नाही. परदेशी च न चे साठे घटत आहेत, आजारी उद्योगांचे प्रमाण वाढते आहे, भाववाढीला सरकार आळा घालू शकलेले नाही.

गेले वर्ष शेती आंदोलनाने गाजले. शेती मालाला रास्त भाव मिळाले पाहिजेत या मागणीवर शेतकरी आता संघटित झाला आहे. सत्तावीस जानेवारीपर्यंत आपल्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर शेतकरी आंदोलन पुन्हा सुरू करण्याचा इशारा उरद जोशीनी दिला आहे. मुख्यमंत्री अंतुले यांनी शरद जोशीची शेतकऱ्याचे दलाल म्हणून संभावना केली होती; पण अखेर त्यांच्याशी बोलणी करणे मुख्यमंत्र्याना भाग पडले. इंदिरा काग्रेसमधल्या एका गटाचा या आंदोलनाला अप्रत्यक्ष पाठिंबा आहे. शेतकरी आंदोलन अंतुले याना नीट हाताळता आले नाही हे निमित्त करून नेतृत्वबदलाची मागणी करावी आणि मुख्यमंत्रिपद दादागटाकडे पुन्हा आणावे या दृष्टीने चाचपणी चालू होती; पण इंदिरा गाधीनी अंतुले याची बाजू ठामपणे घेतल्याने या हालचाली थंडावल्या. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर इंदिरा कॉंग्रेसची मंत्रिमंडळे असलेल्या सर्वच राज्यात मुख्यमंत्र्याच्या पाठीशी उभे राहण्याचे इंदिरा गाधीनी ठरविले आहे.

आपण खरे हरिजनाचे कैवारी असा दावा इंदिरा गांधीचा पक्ष करतो; पण गेल्या वर्षात हरिजनावरील अत्याचार काही कमी झालेले नाहीत. तीन वर्षांत हे अत्याचार तिपटीने वाढल्याचे अनुसूचित जाती व जमातीच्या कमिशनरानीच आपल्या अहवालात म्हटले आहे. जातीय दंगलीबाबतही तेच म्हणता येईल. अल्पसख्याकाचे कैवारी म्हणविणारे इंदिरा सरकार दंगलीना आळा घालू शकले नाही हे मोरादाबाद व उत्तर प्रदेशातील इतर शहरात झालेल्या दंगलीवरून स्पष्टपणे दिसून आले. असे असले तरी हरिजन व अल्पसंख्याक यांचा इंदिरा कॉंग्रेसला असलेला पाठिंबा त्यामुळे कमी होईल असे मानण्याचे कारण नाही. कारण सत्तेच्या आधाराने मिळणारे फायदे इंदिरा कॉंग्रेसच्या मागे राहिल्यानेच मिळतील हे त्याना माहीत आहे.

कच्च्या कैदेतील कैद्याचे डोळे काढण्याचा आसुरी अत्याचार ही गेल्या वर्षातील दुसरी गाजलेली घटना. या प्रकरणी बिहार सरकारचे धोरण पोलिसांना पाठीशी घालण्याचेच दिसून आले. पाहिजे ती माहिती वेळेवर न पुरविल्याबद्दल आणि अंधत्वप्रकरणी स्वत. पुढाकार घेऊन काही न केल्याबद्दल सुप्रीम कोर्टानेही बिहार सरकारवर ठपका ठेवला.

इंदिरा राजवटीचे पहिले पर्व आणि दुसरे पर्व यात एक फरक विशेषत्वाने जाणवतो तो म्हणजे सरकार व पक्ष या दोहोंवरही इंदिरा गाधीची पकड पूर्वीसारखी राहिलेली नाही. संजय गांधीच्या निधनाने त्याचा मोठा आधार गेला. संजय असता तर सरकारमध्ये आणि पक्षावरही त्याच्या गटाचा प्रभाव वाढत गेला असता. आपल्या बाजूच्या आमदार-खासदाराचा मोठा गट त्याने निवडणुकात निवडून आणला होता;पण संजयच्या अपघाती निधनाबरोबर संजय-गटाचा प्रभावही संपला. सजयची जागा त्याची पत्नी मेनकाने घ्यावी अशी सुरुवातीला संजय गटातील काहींची मागणी होती, पण इंदिरा गाधीना ते मान्य नव्हते; त्यामुळे ती मागे पडली आणि राजीवने राजकारणप्रवेश करावा या मागणीने जोर धरला. 'नाही नाही' म्हणता राजीव हळूहळू त्या दिशेने पावले टाकीत आहे. दिल्लीस झालेल्या अखिल भारतीय इंदिरा काग्रेस समितीच्या बैठकीस तो उपस्थित होता. महाराष्ट्राच्या दौऱ्यात तो इंदिरा गांधीबरोबर आला होता. सजयपेक्षा त्याचा पिंड निराळा आहे. तरीही आपला घराण्याचा सत्तेचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी इंदिरा गाधी त्याला हळूहळू प्रकाशात आणीत आहेत असे दिसते.

इंदिरा राजवटीच्या पहिल्या पर्वातील कॉंग्रेस आणि दुसऱ्या पर्वातील इंदिरा कॉंग्रेस याच्यातही फरक आहे. इंदिरा गाधी याच इंदिरा काग्रेसच्या एकमेव नेत्या आहेत. बाकीचे नेते व कार्यकर्ते त्यामानाने फारच दुय्यम दर्जाचे आहेत. इंदिरा गाधीवर प्रभाव पाडून एखाद्या प्रश्नावर आपले धोरण त्याना मान्य करायला लावण्याचे व्यक्तिमत्त्व त्यापैकी एकाहीजवळ नाही. पक्ष व सरकार दोन्हीची सूत्रे इंदिराजीनी आपल्या हातीच ठेवली आहेत. इंदिरा कॉंग्रेस पक्ष स्थापन झाल्याला तीन वर्षे झाली; पण शिस्तबद्ध, संघटित पक्ष म्हणून त्याची उभारणी झाले-

पृष्ठ २० वर

## मुक्ताफळे

# खुन्यांनाच माफी द्यावी !

## —इन्स्पेक्टर जाधव

चार महिन्यापूर्वी उर्दू लेखक इरफान यांचा वांद्रे येथील राहत्या घरी खून झाला. नोव्हेंबरात उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शहा व त्यांच्या पत्नी यांचा खून छापून आला. जानेवारी उजाडला आणि प्रा. शांतादेवी नारायण यांचा लोकल डब्यात खून पडला, तर आणखी आठ दिवसांनी डॉ. रमेश पारीख या रेडियोलॉजिस्ट डॉक्टरांना अंधेरी येथे दवाखान्यातच ठार मारण्यात आले.

एकही गुन्हेगार सापडलेला नाही ! सापडेल का ? सांगता येत नाही.

मुंबई शहरातले एक पोलीसइन्स्पेक्टर जाधव याच्याशी याबाबतीत बोलत असताना ते म्हणाले—

'समाजाची अशी अपेक्षा असते की, ज्यांनी खून केला त्यांना पकडावे व फाशी द्यावे; जे साधारण कमी गंभीर प्रकारचे— चोऱ्यामाऱ्या आदी गुन्हे करतात त्यांना सरकारने तुरुंगात धाडावे. शिक्षा भोगली की ते सुधारून बाहेर येतात व चांगले नागरिक होतात; पण हे असे काहीच घडत नसते !'

मी आश्चर्याने म्हटले—'यातले काहीच घडत नाही ? अहो, चांगल्या चांगल्या घरातल्या देखण्या मुली मुद्दाम तुरुंगात जाऊन गुन्हेगारांना राख्या बांधतात, तिळगूळ देतात तरी ते सुधारत नाहीत ?'

'अहो, या चळवळया बायका काही तरी फॅड काढतात—आम्ही आड येत नाही ! तुरुंगाबाहेरच्या सज्जनांना बांधा राख्या. द्या पोलिसांना तिळगूळ; पण मग हे छापून येणार नाही. फोटो येणार नाही. ते जाऊ द्या. आम्ही या गुन्हेगारांना तुरुंगात काही व्यवसाय शिकवतो. हेतू हा की, बाहेर सुटून आल्यावर त्यांनी पुन्हा चोऱ्यामाऱ्या न करता प्रामाणिक व्यवसाय करावा.'

'हे चांगलं आहे.'

इन्स्पेक्टर जाधव उसळले—

'अहो, काय चांगलं आहे ? इथेच सगळी चूक होतेय. त्यांना प्रामाणिक व्यवसाय शिकवण्यापेक्षा जे गुन्हे—गुन्हेच समजले जात नाहीत, जे केल्यानंतर गुन्हेगार सापडणे शक्य होत नाही, सापडलेच तर गुन्हा सिद्ध करणे कठीण जाते आणि मुख्य म्हणजे हजारात एखादा पकडला गेला तरी बाकीचे ९९९ समाजात सुप्रतिष्ठित, श्रीमंत, कर्तबगार नागरिक समजले जातात असे पांढरपेशी गुन्हे या गुन्हेगारांना शिकवले पाहिजेत.'

'हे गुन्हे कोण शिकवणार ?' मला जाधवांच्या म्हणण्याचा काही उलगडा होईना.

'अहो, बँक अधिकारी, आमदार, खासदार, सरकारी खात्यात काम करणारे कंत्राटदार, नाकेकारकून, आर. टी. ओ. अधिकारी, पोलीस, इन्कमटॅक्सअधिकारी, सरकारी कारकून, अकौंटन्टस् यानी तुरुंगात वर्ग चालवले तर रस्त्यावरच्या चोऱ्यामाऱ्यांची गुन्हेगारी कमी व्हायला वेळ लागणार नाही. अहो, पाकिटमार काय करतो ? १५-२० रुपयापेक्षा ज्यात अधिक मिळकत नसते असे एखाद्या उतारूचे पाकीट—बस चढताना वा गाडीत चढताना तो उडवतो; पण १५-२० रुपयांसाठी किती धोका तो पत्करतो ? चार-चार महिने सक्तमजुरी होते सापडला तर ! पण बँकेत, सरकारी खात्यात, बांधकामात जी लाचलुचपत चालते ती हजारो रुपयांच्या घरात असून—धोका काहीही नाही !'

मी विचार केला तेव्हा लक्षात आले की, इन्स्पेक्टर जाधव यांच्या म्हणण्यात खूपच तथ्य आहे, हे माझ्या लक्षात आले; परंतु खुन्याचे काय ? मी जाधवांना याबाबतीत विचारता ते म्हणाले—

'खुन्याचा प्रश्न निराळ्या मार्गाने सोडवावा लागेल. साधारणपणे खून करणारा माणूस काही प्रत्येकाचा खून करत सुटत नाही. शिवाय हल्ली खून इतके होत आहेत की, त्यातले एक टक्का खुनीदेखील सापडत नाहीत. सापडले तर चार-चार वर्षं त्यांना फाशीच देत नाहीत ! तेव्हा सरकारने जशी बेहिशोबी काळा पैसा सरकारी रोख्यात गुंतवण्याची योजना काढली आहे ना, तशी या खुनाच्या बाबतीत काढावी !'

'म्हणजे काय करायचे सरकारने ?'

'अहो, काळा पैसा जमवणे हा गुन्हा. गुन्हेगार सापडला तर १०-१० वर्षे सक्तमजुरी झाली असती; पण गुन्हेगार सापडत नाहीत, तेव्हा सरकारने काय केले हे मुळी गुन्हेगारच नाहीत, कुठून पैसे आणले हे आम्ही त्यांना विचारणार नाही, असे जाहीर केले ना ? तसेच खुन्याचे आहे. खुनी सापडत नाहीत. तेव्हा खून झालेलाच नाही असे समजून सर्व खुन्यांना आवाहन करायचे— १ जानेवारी १९८१ पूर्वी झालेल्या सर्व खुन्यांना सवलत देण्यात येते की, त्यानी आपण होऊन खून केल्याचे कबूल केले तर ते सज्जन नागरिक समजले जातील. त्यांनी खून का केला ? कसा केला ? याबद्दल त्याना एका अक्षराने विचारण्यात येणार नाही. त्याच्यावर खटला होणार नाही. इतकेच नव्हे तर खून करून त्यानी पळवलेली मालमत्ता त्यांना सरकारी रोख्यात गुंतवण्यासाठी अनुज्ञा राहील !'

इन्स्पेक्टर जाधवानी इतके बोलून माझ्याकडे विजयी मुद्रेने पाहून टाळीसाठी हात पुढे केला.

मला टाळी देववेना ! जाधवानी शेवटी पुढे केलेला हात मागे घेत म्हटले—

'याशिवाय मला तरी गुन्हेगारी कमी करण्याचा दुसरा उपाय दिसत नाही !'

—ग्यानबा

# बिहार
# अ. भा. वि. प. व भा. ज. प. यांचा द्विराष्ट्रवादविरोधी लढा

विनय सहस्रबुद्धे

या *देशाच्या राजकारणाला लागलेली खोटया निधार्मिकतेची कीड* आपले समाजजीवन आणखी किती काळ पोखरणार आहे कुणास ठाऊक ? सबंध पूर्वांचलात विदेशी हस्तकांच्या कारवाया उघडपणे सुरू आहेत; पण मताच्या राजकारणाशी निगडित असलेल्या निधार्मिकतेपोटी सरकार तिकडे कानाडोळा करीत आहे. आसामच्या प्रश्नाची निरगाठ न सुटण्यामागे जी अनेक कारणे आहेत त्यातही अल्पसंख्याकांच्या एकगठ्ठा मतावर आधारित निधार्मिकतेचा बागुलबुवा हे एक प्रमुख कारण आहे. काश्मीर, प. बंगाल, त्रिपुरा, केरळ या प्रांतातही राज्यकर्त्यांच्या खुर्चीचा आधार बनलेली खोटी निधार्मिकता निकोप समाजजीवनावर नवनवे प्रहार करीत आहे. उत्तर प्रदेश सरकारने घोषित केलेला व बिहारने अमलात आणलेला, उर्दूला दुसऱ्या राज्यभाषेचा दर्जा देणारा 'द्वितीय राजभाषा अध्यादेश' म्हणजे निलाजऱ्या राज्यकर्त्यांनी निधार्मिकतेचा डांगोरा पिटत मुस्लिमांना खूष ठेवण्यासाठी टाकलेले नवे पाऊल आहे.

गेल्या १९ नोव्हेंबरला, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या वाढदिवशी बिहारमध्ये राष्ट्रीय एकात्मता-दिवस सरकारीरीत्या पाळला गेला व राज्याचे तथाकथित पुरोगामी मुख्यमंत्री डॉ. जगन्नाथ मिश्रा यांनी हिंदीबरोबरच उर्दूला राज्याची 'दुसरी' राजभाषा' म्हणून घोषित करणारा खास अध्यादेश काढला. राज्याचे राज्यपाल डॉ. अखलक् किडवाई यांनी कोणाच्याही विरोधाला न जुमानता आम्ही या वटहुकुमाची अंमलबजावणी करू अशी डरकाळी फोडून वटहुकुमावर अधिकृतपणे स्वाक्षरी केली. राष्ट्रीय एकात्मतादिनी निघालेल्या या वटहुकुमाने बिहारमधील अंतर्गत सामंजस्याला आणि एकात्मतेला तडा जाण्यास खरे म्हणजे इथूनच सुरुवात झाली.

या वटहुकुमामागचे मुस्लिम-अनुनयाचे राजकारण ज्याना स्पष्ट दिसत होते अशा सर्वांनी या वटहुकुमाविरुद्ध तीव्र निषेध नोंदविला. बिहार प्रदेश भा. ज. प. चे अध्यक्ष जगदंबीप्रसाद यादव व अन्य नेत्यांनी या सरकारी कृतीची तीव्र निर्भर्त्सना केली. याउलट लोकदल, डावे व उजवे कम्युनिस्ट, अर्स काँग्रेस, फॉरवर्ड ब्लॉक व क्रांतिकारी समाजवादी पक्ष यानी एकत्र येऊन स्थापन केलेल्या 'संयुक्त प्रचार–अभियान समितीने' मात्र या वटहुकुमाचे स्वागत केले व पुरोगामी दिशेने टाकलेले एक पाऊल या शब्दात वटहुकुमाचे समर्थनही केले. राज्यातील जनता पक्षाच्या पुढाऱ्यांनाही या वटहुकुमात निधार्मिकतेच्या संदर्भात आशेचा एक किरण दिसून आला व त्यांनीही वटहुकुमाचे समर्थनच केले.

भा. ज. प. वगळता सर्व राजकीय पक्ष व सरकार जनमताचा कानोसा न घेता काढलेल्या या वटहुकुमाचे समर्थन करीत असताना *बिहारच्या जिल्ह्याजिल्ह्यातील जनतेच्या मनात या वटहुकुमा*विरुद्ध असणारा असंतोष संघटित करण्याचे काम अ. भा. विद्यार्थी परिषदेने केले. बिहार प्रदेश विद्यार्थी परिषदेचे सरचिटणीस सुशिलकुमार मोदी, तसेच हरेंद्र पांडे, कृपाप्रसाद सिंग इ. नी एकत्र येऊन अन्य विद्यार्थीनेत्यांच्या सहाय्याने 'द्वितीय राजभाषा–विरोधी समितीची' स्थापना केली व सरकारविरुद्ध संघर्षाचे शिंग फुंकले. या संदर्भात पहिली कृती म्हणून ३ डिसेंबरला पाटण्यात व अन्य शहरातून विद्यार्थ्यांनी मोर्चे काढले व वटहुकुमाच्या प्रतीची जाहीर होळी केली. गोपालगंज, सोनपूर, मुंघेर इ अनेक ठिकाणी त्यानंतर सतत आठवडाभर जनतेने उत्स्फूर्तपणे रस्त्यावर येऊन निदर्शने केली. सोनपूर येथे निदर्शकावर बेछूट लाठीमार केला गेला. त्यात २४ विद्यार्थी घायाळ झाले, तर ३०० जणाना पोलीसकोठडीत डांबून ठेवण्यात आले.

आंदोलन हळूहळू राज्यव्यापी बनू लागले ४ डिसेंबरलाच बिहार उच्च न्यायालयाच्या ३ ज्येष्ठ वकिलांनी एक पत्रक काढून आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. ५ डिसेंबर या दिवशी राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी छातीवर काळे बिल्ले लावून या वटहुकुमाला असलेला आपला विरोध स्पष्ट केला. ८ डिसेंबरला बिहार विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले. दुसऱ्याच दिवशी राज्यभरातून आलेल्या हजारो नागरिकांनी विधानसभेवर एक प्रचंड धडकमोर्चा नेऊन आपला विरोध प्रकट केला. स्थानिक व अन्य शहरातून आलेले महाविद्यालयीन विद्यार्थी या मोर्च्यात अग्रेसर होते. जनतेचा हा उत्स्फूर्त विरोध दडपण्यासाठी सरकारने पोलिसबळाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला.

'१७ डिसेंबर बिहार बंद' हे द्वितीय राजभाषा विरोधी आंदोलनाचे पुढचे पाऊल होते. अलीकडेच २७ ऑक्टोबर रोजी डाव्या पक्षानी महागाईविरोधी 'बिहार बंद'चा आदेश दिला होता. २७ ऑक्टोबरच्या त्या 'बिहार बंद'पेक्षा किती तरी *अधिक पटीनी* १७ डिसेंबरचा 'बिहार बंद' यशस्वी ठरला ! १७ डिसेंबरच्या दुपारी बिहार विधानसभेचे सर्व पुरोगामी सदस्य उर्दूला दुसऱ्या राजभाषेचा दर्जा देणारे विधेयक बहुमताने मान्य करून 'वैचारिक दिवाळी' साजरी करीत होते तर पाटण्यासकट अन्य ३२ जिल्हा केंद्रातील जनता याच विधेयकाविरुद्ध निषेध म्हणून कडकडीत हरताळ पाळीत होती. पूर्णिया, सरसहा, हाजीपूर, बिहारशरीफ, भागलपूर इ. अनेक ठिकाणी बंद शांततेने पार पडला. बख्तियारपूर, नवादा भागातही बंदला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. हजारीबाग शहरात माध्यमिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वर्गावर बहिष्कार टाकून उत्स्फूर्तपणे

एक मूक-मिरवणूक काढली.

सामान्यपणे शांततामय पद्धतीने चाललेल्या या आंदोलनात काही तुरळक ठिकाणी हिंसेने डोके वर काढले. दरभंगा, मुझफरपूर आणि रांची या ठिकाणी जमाव नियंत्रणाबाहेर गेला. मुझफरपूर या ठिकाणी रेल्वेच्या डब्याला जमावाने आग लावली तर रांची, दरभंगा इ. ठिकाणी परिस्थिती बिघडल्याने संचारबंदी लागू करण्यात आली. लहेरिया सराय आणि रांची या ठिकाणी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात सुमारे सहाजण ठार झाले, तर शंभराहून अधिक गंभीररीत्या जखमी झाले. यापैकी अनेक शहरांतून स्थानिक पोलिसाच्या मदतीला सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनाही पाचारण करण्यात आले होते.

दरम्यान १७ डिसेंबरला विधानसभेने संमत केलेले 'बिहार राजभाषा (दुरुस्ती) विधेयक १९८०' १९ डिसेंबरला विधान परिषदेनेही संमत केल्याने वटहुकुमाची जागा घेणाऱ्या या विधेयकाचे अखेर कायद्यात रूपांतर झाले. अन्य अनेक प्रश्नांवर ज्यांच्यात मतभेद आहेत ते बिहारचे मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा व विरोधीनेते कर्पूरी ठाकूर या उभयतांनी विधेयकाला पाठिंबा दिला व या विधेयकाच्या नावाखाली रा. स्व. संघ व अ. भा. विद्यार्थी परिषद राज्यात जातीय विद्वेष भडकवीत असल्याचा आरोप केला. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांबरोबरच लोकदलाचे जाबर हुसेन, मार्क्सवादी कम्युनिस्टाचे गणेश शंकर विद्यार्थी व जनता पक्षाचे राजमंगल मिश्र इ. नीही भा. ज. प. व रा. स्व. संघावर कडाडून टीका केली. भा. ज. प. चे नेते इंद्रसिंग नामधारी यानी सरकारी धोरणाचा समाचार घेतला व उर्दू लादण्याच्या निषेधार्थ आपल्या पाठिराख्यांसह सभात्याग केला.

१७ व १८ डिसेंबरला पोलिसानी केलेल्या गोळीबारात मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांना आदराजली वाहण्यासाठी १९ व २० डिसेंबरला अनेक ठिकाणी मूकमिरवणुका काढण्यात आल्या. पाटण्यात हजारो विद्यार्थ्यांबरोबरच अनेक प्रतिष्ठित नागरिकानी एकत्र येऊन हिंदी साहित्य संमेलन भवनापासून एक मोठी मूक मिरवणूक काढली. शेवटी उर्दू विधेयकाला तीव्र विरोध करण्याची सामुदायिक शपथ घेतली गेल्यानंतर मिरवणूक विसर्जित झाली. सरकारी दमननीतीमुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेला अधिक धोका पोचू नये म्हणून दि. २० डिसेंबरपासून द्वितीय राजभाषा विरोधी समितीने आपले आदोलन पंधरा दिवसासाठी स्थगित केले ५ जानेवारीपासून नव्या जोमाने पण शाततामय पद्धतीने हे आदोलन पुन्हा सुरू झाले आहे.

### वृत्तपत्रांचा पाठिंबा

सुमारे महिनाभर चाललेल्या या आंदोलनात आतापर्यंत एकूण १० जण ठार झाले आहेत तर २०० जखमी झाले आहेत. हे आदोलन प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी चालविले असले तरी त्यात सामान्य जनतेचा व्यापक सहभाग होता. समाजातील सर्व स्तराच्या जनतेने या आदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा दिला होता. जनतेच्या या भावनांचे प्रतिबिंब राज्यातील सर्व प्रमुख वृत्तपत्रातही पडले होते. राज्यातील बहुसंख्य वृत्तपत्रानी पक्षातीतपणे या प्रश्नाचा विचार करून उर्दूला राजभाषा म्हणून मान्यता देण्याच्या निर्णयाचा कठोर निषेध केला. दिल्लीच्या नवभारत टाइम्सने जगन्नाथ मिश्रा सरकारला राज्यातील भ्रष्टाचार व ढासळती कायदा व सुव्यवस्था रोखण्यात आलेल्या अपयशाला झाकण्यासाठी राज्यसरकारने हा नवा वाद निर्माण केल्याचा स्पष्टच आरोप केला आहे. 'जे काम पं. नेहरू, मौ. आझाद, डॉ. श्रीकृष्ण सिंह, पं. विनोदानंद झा प्रभृती करू शकले नाहीत, वा तसे करणे ज्यांना योग्य वाटले नाही ते काम मिश्रा सरकारने केले आहे' असे म्हणून पाटण्याच्या दै. आर्यावर्तने (२२.१२.८०) आपल्या संपादकीयात पुढे म्हटले आहे .. 'अब इस राज्य में तीन भाषाएँ राज्य का दर्जा पा गयी हैं. हिंदी के उपर अंग्रेजी शासन करती रही है ओर अब नीचे से उर्दू उसे धक्का देती रहेगी।' दिल्लीच्या टाइम्स ऑफ इंडियानेही मिश्रा सरकाने अकारण निर्माण केलेला नवा वाद अशा शब्दात या विधेयकावर टीका केली असून हे विधेयक मागे घेण्याचे शहाणपण राज्यसरकारला सुचेल अशी अशा व्यक्त केली आहे. दिल्लीच्याच 'इंडियन एक्सप्रेस'ने केवळ १०% उर्दू भाषिकांसाठी उर्दू राजभाषा बनविण्याचा राज्यसरकारचा निर्णय हा राजकीय खुळेपणा' असल्याचा अभिप्राय व्यक्त केला आहे. 'सन्मार्ग' या बिहारमधील एका मोठ्या दैनिकाने आपल्या २० डिसेंबरच्या अग्रलेखात राज्यशासनाने उर्दूला राजभाषेचा दर्जा देऊन स्वत साठी खड्डा खणल्याचा स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला आहे. 'बर्बादी के मलवेपर उर्दू को खडा न करे' अशी विनंतीही या अग्रलेखात करण्यात आली आहे. 'प्रदीप' या अन्य एका वृत्तपत्रानेही अल्पसंख्य जमातीची मताशी सांगड घालून विचार करण्याच्या सरकारी धोरणाचा तीव्र निषेध केला आहे. सर्चलाइट व अन्य वृत्तपत्रांनीही सर्वसामान्यपणे उर्दू विधेयकाला तीव्र विरोध केला आहे.

केवळ अग्रलेखातूनच नव्हे तर वाचकांच्या पत्रव्यवहारातूनही उर्दू-विधेयकाला असलेल्या सार्वत्रिक विरोधाचे प्रतिबिंब पडल्याचे दिसून येते. दै. आर्यावर्तच्या १२ डिसेंबरच्या अंकात उर्दू-विधेयकावर उपहासगर्भ टीका करून एका नवकवीने लिहिले आहे–

हिंदी हिंदी सब कहे
उर्दू कहय न कोय
एक बार उर्दू कहय
वोट सुरक्षित होय

द्वितीय राजभाषा–विरोधी समितीच्या या आदोलनाला समाजाच्या सर्व स्तरांतून एवढा पाठिंबा मिळण्यामागे कारणेही तशीच आहेत. उर्दू भाषिकांची संख्या केवळ ८.८६% असताना उर्दूला राजभाषेचा दर्जा देण्यामागे कोणतेही सयुक्तिक कारण जगन्नाथ मिश्रा सरकारपाशी नाही. १९५४ मध्ये भाषावार प्रांतरचना करण्यात आली. त्या वेळी राज्यपुनर्रचना आयोगाने आपल्या अभिप्रायात स्पष्टच म्हटले होते की, एखाद्या राज्यात ६०% लोक जी भाषा बोलतात ती त्या राज्याची राजभाषा गणली जाईल व अन्य लोकांपैकी ३०% लोक दुसरी एखादी भाषा बोलत असतील तर ती राज्याची दुसरी राजभाषा म्हणून गणली जावी.

या पार्श्वभूमीवर बिहारमधील वस्तुस्थिती तपासण्यासारखी आहे. बिहारमध्ये मुस्लिमधर्मीय केवळ १३.४८% आहेत व १९७१ च्या जनगणनेनुसार एकूण उर्दू भाषिकांची संख्या केवळ ८.८६% आहे. शिवाय जर ८.८६% लोकाची भाषा राजभाषा होऊ शकत असेल

तर त्यापेक्षा अधिक जनतेकडून जी भाषा बोलली जाते ती बंगाली किंवा संथाली भाषा राजभाषा का होऊ नये ? सिंहभूम, संथाल व धनबाद परगण्यात बंगला बोलणाऱ्यांची संख्या अनुक्रमे २७·२५% १७·१०% आणि २१·८९% इतकी आहे. अशा स्थितीत या भाषिकांवर उर्दू लादण्यात तर्कसंगती कोणती ? संथाल व सिंहभूम भागात संथाली भाषिकांची संख्या सरासरी २२% आहे. तिथेही उर्दू ही राजभाषा म्हणून का लादली जावी ? त्यातूनही उर्दूला राजभाषेचा दर्जा देण्यावर सरकार इतके दुराग्रही असेल तर उडिया, बंगला, संथाली या भाषांनाही राजभाषेचा दर्जा देण्यास सरकारची तयारी आहे का ? खरे तर या तिन्ही भाषा लोकभाषा असल्याने राजभाषापदावर त्यांचा अधिक न्याय्य हक्क आहे.

उर्दूला राजभाषेचा दर्जा देण्याच्या सरकारी निर्णयाचे अनेक विचित्र परिणाम संभवतात. या विधेयकामुळे आता हिंदी व उर्दू या दोन्ही भाषा जाणणाऱ्या व्यक्तीस सरकारी नोकरीत अग्रक्रम दिला जाईल. गरज असो वा नसो सर्व शाळा व महाविद्यालयांतून उर्दू विभाग उघडण्यात येतील व त्यातून ७० हजार उर्दू शिक्षकांना नोकरी मिळेल. सर्व सरकारी कागदपत्रे हिंदीबरोबरच उर्दूतही प्रसिद्ध होतील. सरकारी कार्यालये, मैलांचे दगड, बसगाड्यांचे नामफलक इत्यादींवर इंग्रजी व हिंदीच्या जोडीने आता उर्दूही विराजमान होईल. रेशनकार्डापासून राजपत्रापर्यंत सर्वत्र उर्दूला नवा सन्मान मिळेल. विधानसभेच्या कामकाजाची नोंद आता उर्दूतूनही होईल. बिहार सरकारला आता प्रचंड संख्येत उर्दू टंकलेखनयंत्रे विकत घ्यावी लागतील.


उर्दू शिकणे सर्वांवर बंधनकारक राहणार नाही असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे व ते खरेच आहे; परंतु सरकार–दरबारी ज्या भाषेचा वापर होतो ती भाषा नोकरी मिळविण्यासाठी शिकण्याकडे सर्वसामान्यांचा कल असतो. (उदा. इंग्रजी) हे लक्षात घेता उर्दू शिकणाऱ्यांची संख्या वाढेल हे उघड आहे. उर्दूला राजभाषा केल्याने कराव्या लागणाऱ्या या सर्व फेरबदलांनीही सरकारचा प्रशासनिक खर्च २५ कोटी रुपयांनी वाढेल तो वेगळाच.

उर्दूला राजभाषेचा दर्जा देण्याबाबत बिहारचे मुख्यमंत्री डॉ. जगन्नाथ मिश्रा यांनी आपल्या निर्णयाचे समर्थन करताना जे तीन मुद्दे मांडले आहेत, ते तिन्ही तर्कविसंगत व तकलादू आहेत. उर्दू आपल्या जीवनाचे आवश्यक अंग असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे. शिवाय उर्दू केवळ उर्दू भाषिकांसाठीच आहे व तिचा अभ्यास सर्वांसाठी बंधनकारक नसेल असेही त्यांनी म्हटले आहे. मुळात उर्दू ही जर आपल्या ( सर्वांच्या ) जीवनाचे आवश्यक अंग असेल तर ती केवळ उर्दू भाषिकांसाठीच कशी असेल ? तेव्हा डॉ. मिश्राजींची पहिली दोन्ही विधाने परस्पर छेदक आहेत. उर्दू शिकणे सर्वांसाठी बंधनकारक नसेल हे विधानही असेच आहे. उर्दू जर बंधनकारक नसेल तर उर्दू जाणणारा व न जाणणारा उमेदवार सरकारी नोकरीत सारखाच मानला जाईल काय ? एखादा उर्दू अर्ज सरकारी अधिकाऱ्याला समजला नाही तर तो दोष कोणाचा ? तेव्हा हे तिसरे प्रतिपादनही अर्थशून्यच आहे.

थोडक्यात म्हणजे राज्यातील मुस्लिमांची एकगठ्ठा मते डोळ्यांपुढे ठेवून डॉ. मिश्रा सरकारने मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत घोषित केलेला हा निर्णय पूर्णपणे अव्यवहार्य व अनावश्यक तर आहेच; पण त्यामुळे बिहारमध्ये उर्दूविरुद्ध संथाली, बंगला, उडिया, मैथिली अशा भाषावादांना उत्तेजन मिळत आहे, ते अधिक भयानक आहे. बिहार सरकारचा हा निर्णय निव्वळ संधिसाधूपणाचा आहे. १९२६ मध्ये उर्दूला सरकारी कामकाजाची भाषा ठरविण्यास राजेंद्रप्रसादांनी विरोध केला होता. १९६७ साली संविद सरकारच्या अशाच एका निर्णयाला खुद्द जयप्रकाशांनी तीव्र विरोध दर्शविला होता. हे कोणतेही ऐतिहासिक संदर्भ लक्षात न घेता बिहार सरकारने हे अत्यंत चुकीचे पाऊल उचलले आहे व आता उ. प्रदेश सरकारही त्याच मार्गावर आहे.

या आंदोलनाबाबत अ. भा. वि. प. च्या पुढाकाराने स्थापन झालेल्या द्वितीय राजभाषा विरोधी समितीची भूमिका स्पष्ट आहे. या समितीने म्हटले आहे की उर्दू वा अन्य क्षेत्रीय भाषेच्या विकासाला आमचा विरोध नाही. फक्त अकारण अल्पसंख्यांकांच्या भाषेला राजभाषा बनवून द्विराष्ट्रवादाची जी बीजे रोवली जात आहेत त्यांनाच आमचा विरोध आहे ! □


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# लाल बावटा आणि एक ' स्वाध्यायी '

त्या दिवशी रविवार होता.

कामगार गेट अडवून गेटच्या बाहेर बसलेले.

घोषणाचा तुबळ कल्लोळ चाललेला.

वातावरणात टेन्शन, तणाव.

हमरीतुमरीवर आल्यासारखी परिस्थिती.

गेटच्या आत मात्र अस्वस्थ शांतता.

गेटवर हात बाधून गुरखा उभा.

गेटच्या बाहेर अस्वस्थ गलका. फडफडत्या लाल बावटयानं अस्वस्थतेची तीव्रता जास्त जाणवायची.

बदलीसारख्या एका किरकोळ कारणाचं निमित्त करून कंठशोष करणारा पुढारी तावातावानं बोलत होता ' बस्स, बस्स, आता नाही सहन करणार हा जुलूम ! आमच्या मागण्या आम्ही लढून मिळवणार, आता रोज एक एक मागणी वाढणार, मागण्यांचं मारुतीचं शेपूट वाढतच जाणार आणि एक दिवस त्याचा विळखा बसल्याखेरीज राहाणार नाही !' शब्दांची आतषबाजी, कोटया, विनोद करत कॉम्रेड पुढारी बोलत होता. पडणाऱ्या टाळयांनी खुष झाला होता. पडणाऱ्या टाळया या त्याच्या घुसखोरीच्या यशस्वितेची साक्ष होत्या.

—तालुक्यासारख्या अर्धवट नागरी भागातला हा कारखाना सुरू झाल्याने आजूबाजूच्या पाच-सात मैलाच्या परिसरातील लोकांना काम मिळालेल. अशिक्षित स्त्रिया, पुरुष. स्त्रियांची संख्या जास्त—

दोनशेच्या आसपास. पुरुष पन्नास-पाउणशे.

गेली सात-दहा वर्षं कामगार-मालक-संबंध सलोख्याचे.

कोणतीही समस्या, प्रश्न सामंजस्यानं सुटायचा. कामगारांची युनियनही विधायक विचार करणारी. आपल्या कोणत्याही नडी-अडचणीला कामगार थेट मालकापर्यंत जाऊ शकायचा—नड भागायची.

कामगारही आदबशीर. आपलं समजून वागणारे, काम करणारे.

पण घुसखोरीसाठी या लढावू ( ? ) कॉम्रेड पुढाऱ्यानं संधी शोधली.

बदलीच्या किरकोळ कारणाचं निमित्त करून शब्दाच्या - आक्रमक आतषबाजीनं कामगारांना भारून टाकलं.

गेट अडवून बाहेर बसलेले कामगार त्याची साक्ष होते. भाषण संपलं—

आवाज उठला—' लाल बावटेकी जय ! '

वाढत्या उन्हाबरोबर घोषणांचा कल्लोळ कमी व्हावयाच्याऐवजी वाढत होता.

घोषणा सुरूच राहिल्या.

पुढारी झाडाच्या सावलीत सरकला.

अचानक घोषणाचा जोर कमी झाला.

इतका वेळ बेहोष घोषणा देणारे थंडावले.

शुभ्र वेष-धोतर, झब्बा, गळयात रुद्राक्षाची माळ.

शांत सात्विक चेहरा.

गर्दीनं ' स्वाध्यायी ' ला वाट दिली.

आठवडयातला प्रत्येक रविवार हा त्याचा ठरलेला दिवस.

कामाच्या वेळेतला अर्धा तास मालकांनी त्याना दिलेला.

सर्व कामगार एकत्र व्हायचे. अर्धा तास गुंगून जायचे. धीरगंभीर आवाज घुमत असायचा—कामगाराचा एक सुरातला कोरस साथ करायचा. वातावरण भारून जायचं.

घोषणा थंडावल्या.

गर्दीतून स्वाध्यायी रोवलेल्या बावटयाशेजारी उभे राहिले.

एकवार सर्व जमावावरून शांत नजर फिरवली.

' तुम्ही कामावर गेलेले दिसत नाही, का ? कशासाठी ? या वादात मी शिरत नाही.

' फक्त साध्य व साधन याची गल्लत करून वाहावत जाऊ नका. स्वतःशी प्रामाणिक असा. आपल्याला फरशीचं आवार काय, रस्ता काय-काहीच फरक पडत नाही. आपण सुरू करू या—'

डोळे मिटले—

कोरसला सुरुवात झाली. कामगार बावटयाला विसरले.

नकळत हात जोडले गेले—

' धर्म ही अफूची गोळी आहे ' या तत्त्वज्ञानाला कवटाळून बसलेला कॉम्रेड पुढारी हताश होता. त्याला प्रश्न पडला असावा, ' लाल बावटे की जय ' च्या बेहोष घोषणा देणारे खरे की हे रामनामात रमलेले खरे ?

आपल्या अनुयायाना अडवणं कॉम्रेड पुढाऱ्याला शक्य नव्हतं.

प्रश्न त्याच्या अस्तित्वाचा होता.

स्वत.चे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी विधिनिषेधशून्य राजकारण खेळणाऱ्या या लढाऊ (?) कॉम्रेड पुढाऱ्याची अशिक्षित कामगारानी केलेली फरपट मोठी प्रेक्षणीय होती.


स्वत ची ' ड्रॅशिंग इमेज ' उभी करण्याच्या धडपडीत, किरकोळ इश्यू घेऊन अस्वस्थता निर्माण करणारे हे पुढारी आपल्या अनुयायांची वैचारिक तयारी करायचं धाडस मात्र दाखवत नाहीत. कारण प्रश्न त्याच्या अस्तित्वाचा असतो.

याउलट पेटत्या वातावरणात घुसून लाल बावटया' च्या साक्षीनं लोकाना धर्माचे धडे देणाऱ्या स्वाध्यायीला नक्कीच ' ड्रॅशिंग ' म्हणायला हवं.

कारण आपल्याला काय म्हणायचं आहे हे सांगायचं धाडस तरी त्याच्यात आहे—आणि सागायला ते उरलेही नाहीत.

अडवायला लढाऊ ( ? ) कॉम्रेड पुढारी मागं उरला.

—विनय गुणे, संगमनेर



“ महात्मा फुल्यांनी शेतकऱ्यांच्या आसुडाविषयी जे सांगितलं त्यामध्ये व आज मी जे काही सांगतोय त्यामध्ये काहीही फरक नाही ”....शरद जोशी

# विदर्भ दौरा.... दिनांक ४, ५, ६, ७ डिसेंबर १९८०

सतीश कामत

नाशिकचं आंदोलन १८ डिसेंबरपर्यंत स्थगित करून शेतकरी नेते शरद जोशी ३० नोव्हेंबरला पुण्यात आले ते विदर्भाच्या तरुण शेतकऱ्यांचं निमंत्रण घेऊनच. पुण्यातल्या 'माणूस' कार्यालयात एक डिसेंबरला श्री. शरद जोशींबरोबर अनौपचारिक गप्पांचा कार्यक्रम होता. पुणे विद्यापीठातले काही प्राध्यापक, अर्थतज्ज्ञ व इतरही या आंदोलनाबद्दल, शरद जोशींबद्दल कुतूहल निर्माण झालेली मंडळी या कार्यक्रमाला आली होती. बुद्धिवंतांपासून खेड्यातल्या शेतकऱ्यापर्यंत आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यापर्यंत जोशींनी एकच सूर लावला होता– 'आमचा भाव टाका !'

विदर्भात श्री. शरद जोशी यांचं नाव केव्हाच जाऊन पोचलं होतं; पण त्यांनी स्वतः अजून त्या परिसराचा एकदाही दौरा केला नव्हता. नाही म्हणायला, चार ऑक्टोबरला ते फक्त दर्यापूरला जाऊन आले होते व त्याच वेळी त्यांनी वऱ्हाडच्या 'माती'ची चाचपणी करून दौऱ्याचा हंगाम ठरवला असावा. चार ते सात डिसेंबर असे चार दिवस त्यांनी विदर्भासाठी काढले होते. स्वच्छ आर्थिक विचार आणि एका मोठ्या आंदोलनाचं यश प्राप्त झालेला बिनराजकीय नेता पूर्णतः अनोळख्या भागात जाऊन स्वतःचं बस्तान बसवण्यासाठी कशी सुरुवात करतो, हे पाहणं जास्त इंटरेस्टिंग होतं. कारण तात्त्विक पातळीवर तर्कशुद्ध विचार मांडणारे किंवा आंदोलनाने गती घेतल्यावर त्याचं स्टिअरिंग वळेल तिकडे वळू देणारे नेते अनेक पाहिले आहेत; पण या दोन्हींचं उत्कृष्ट मिश्रण करून कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त लाभ उठवण्याचा प्रयत्न करणारा नेता संघटन व संघर्षासाठी जमिनीची मशागत कशी करत असेल हे कुतूहल अनेकांना असतं, मलाही होतं, म्हणूनच नोकरीतून रजा काढून श्री. जोशींबरोबर विदर्भाच्या दौऱ्यावर जायचं ठरवलं.

□

चार डिसेंबरची सकाळ झाली तेव्हा महाराष्ट्र एक्सप्रेसनं अकोला मागं टाकलं होतं, मूर्तिजापूर येईपर्यंत दुपारचा एक वाजला. दुपारी अडीच वाजता दर्यापूर इथं भेटण्याचं ठरलं होतं. श्री. जोशी नासिकहून कोर्टाची तारीख उरकून येणार होते. मी सरळ पुण्याहूनच निघालो होतो. मूर्तिजापूर ते दर्यापूर हे सुमारे अठरा–वीस मैलांचं अंतर. मूर्तिजापूरला उतरून धुळीचं वारं खात दर्यापूरला पोचलो तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. एस. टी. स्टँडवरून सायकलरिक्षा केली आणि थेट सभेच्या ठिकाणी पोचलो.

'कृषि उत्पन्न बाजार समिती मैदान, दर्यापूर'. मैदान मोठं. उत्तम शेड. शेडला लागूनच व्यासपीठ उभारलेलं. शरद जोशींची सभा लवकरच सुरू होणार असल्याचं– 'तरी शेतकरीबंधूंनी मैदानात यावं'– आवाहन माइकवरून वारंवार केलं जात होतं. दोन अनाउन्समेंटस्च्यामध्ये एखादं गाणंही वाजवलं जात होतं. पंधरा–वीस कार्यकर्त्यांची धावपळ चालू होती. दर्यापूरचे एक तरुण शेतकरी श्रीकांत तराळ यांच्या घरीच जोशी उतरले होते. अजून ते तराळांकडेच बसले असल्याचं समजल्यानं रिक्षा पुन्हा तराळांच्या घराकडे वळवली. या लहान लहान गावांमध्ये हे एक बरं असतं. कोणत्याही माणसाचं घर विचारलं की कुणीही थेट त्याच्या दारातच नेऊन उभं करतं ! कितवी लेन, घरनंबर काय, जवळची खूण काय असले प्रश्न इथे गैरलागू असतात.

सायकल–रिक्षा मैदानातून पुन्हा सडकेवर आली आणि मोटारसायकलवरून मैदानात शिरत असलेल्या एका तरुणानं थांबवलं. माझा एकंदर अवतार आणि नव्या गावात शिरणाऱ्या माणसाच्या चेहऱ्यावर दिसावेत तसे भाव त्याने चटकन ओळखले. मी आत्ता येईन, याची कल्पना असल्याने शरद जोशींनीच त्याला पाठवलं होतं. रिक्षातली बॅग घेऊन त्या तरुणाच्या मोटारसायकलवर जाऊन बसलो. पांढरा लेंगा–झब्बा, सबंध चेहऱ्यावर उठून दिसणारं नाक आणि कुरळ्या दाढी–मिश्यांच्या या तरतरीत तरुणाचं नाव होतं श्रीकांत तराळ.

मोटारसायकल त्याच्या घराच्या दिशेनं धावायला लागली आणि

आमचं औपचारिक बोलणं सुरू झालं. वऱ्हाडी माणसाजवळ असणारी अदबीची भाषा आणि कोकण्याशी स्पर्धा करणारे त्या भाषेला दिले जाणारे वऱ्हाडी हेलकावे श्रीकातच्याही बोलण्यात होतेच. वऱ्हाडात येऊन पोचल्याची पहिली पावती या हेलकाव्यानीच दिली. उत्तर प्रदेशीय मिठ्ठास उर्दू किंवा हिंदीशी या वऱ्हाडी हेलकाव्याचा काही तरी संबंध असावा असं मला पुढले चार दिवस सतत वाटत राह्यलं. शिवाय भाषेतली ती अदबही तशीच; पण असो. हा भाषाशास्त्रज्ञांचा प्रांत आहे.

¤

श्रीकांतच्या घरी शरद जोशीची भेट झाली. त्यांच्याबरोबर त्याचे लेफ्टनंट शंकरराव वाघ होतेच. हा वाघ म्हणजे एकदम मस्त माणूस आहे ! किरकोळ शरीरयष्टी, उंचीही फारशी नाही लेंगा, शर्ट आणि डोक्याला टोपी असा याचा पोशाख–एकदम एल. आय. बी.चा कॉन्स्टेबल वाटावा असा; पण यांच्याशी बोलायला लागलं की जाणवतं की कुशाग्र बुद्धिमत्ता ही केवळ शहरवाल्याची मक्तेदारी नव्हे. लेफ्टनंट वाघ तुमचा एक शब्दही खाली पडून देणार नाहीत. आपण एक वाक्य बोललो की त्याच्यावर याची चार वाक्यं असणारच आणि तीही तुम्हाला गप्प करतील अशी ! शरद जोशीवर त्यांची फार भक्ती. चाकणच्या कादा–आदोलनात जोशींबरोबर लढले आणि तेव्हापासून त्यांची संगत सोडलेली नाही. प्रसंग आला तेव्हा बापाशीही भाडून स्वतःची स्वतंत्र पेढी टाकली; पण शरद जोशी म्हटलं की गडी गप्प! अर्थात वेळ पडली तर जोशीचे जोडे शोधूनही व्यासपीठापाशी नेऊन देणारा हा माणूस, 'साहेब, लई सभा घ्यायच्या न्हाइत- माल कमी विकला तरच मालाला तेजी राहाते,' अशी जोशीना रोखठोक व्यापारी सूचना करायलाही कमी करत नसे. अगदी बारीक–सारीक गोष्टीवरही याचं कडक लक्ष ! कुठल्याही गावाला जोशीची सभा सुरू झाली की हा मध्येच गायब व्हायचा. सभेला माणसं कोण, गावात गट किती, सभेसाठी पोलीस किती, 'पिंजऱ्यांच्या गाड्या' (पोलीसव्हॅन) किती, सगळी माहिती काढून आणायचा आणि सभा संपवून आम्ही दुसऱ्या गावाला निघालो की याचं हिशेब देणं सुरू व्हायचं; पण त्याच वेळी गाडीच्या ड्रायव्हरला खायला–प्यायला मिळालं की नाही याचीही चौकशी असायची ! आम्ही कुणाकडे गेलो की आमच्या पुढ्यात येणारी बशी ड्रायव्हरपर्यंत जाईल याकडे वाघांचं सतत लक्ष असायचं.काद्याच्या –पापुद्र्यासारखा हा माणूस – ज्याला ढंगदार व्यक्तिमत्त्वाची ओढ आहे अशा प्रत्येकानं भेटलंच पाहिजे असा !

शरद जोशीशी बोलत असतानाच काही कार्यकर्ते आले आणि सभेला जायची वेळ झाल्याचं त्यानी सांगितलं. बाहेर ट्रॉली जोडलेला ट्रॅक्टर उभा होता. आम्ही सर्वजण ट्रॉलीमध्ये चढलो. सबंध गावातून फिरत ट्रॅक्टर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मैदानात आला. पाचशे–हजार माणसं– जमली होती. आमच्या ट्रॅक्टरच्या मागोमाग आणखी एक मोठा लोंढा मैदानात शिरला आणि नंतर तो किती तरी वेळ येतच राह्यला !

सभेपूर्वी गावात पत्रकं वाटण्यात आली होती. पत्रकात म्हटलं होतं–

'देशाचा विकास देशातील सत्तर टक्के शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाशिवाय शक्य नाही, हे सर्वजण कबूल करतात; परंतु शेतमालाचे भाव वाढवून दिल्यास महागाई वाढेल, असा खोटा व घातकी प्रचारही केला जातो या प्रचाराला बळी न पडता शेतकऱ्यांनी संघटित व्हावं आणि विचार करावा की गेल्या चार–पाच वर्षांत शेतमालाचे भाव सरासरीने स्थिर असतानाही महागाई वाढण्याचं कारण काय ?

'सरकारने १९६५ ते १९७५ पर्यंत शेतकऱ्यांकडून एकशेदहा पोती लेव्ही ज्वारी सक्तीनं वसूल केली. ह्या सर्व ज्वारीवर सहा रुपये वाहतूक–खर्च व आठ रुपये नफा असा चौदा रुपये दर प्रति क्विंटलमागे देऊ असे ठरविल्यानंतरसुद्धा त्याचे १५४० कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले नाहीत; परंतु भारतातील सर्व शेतकऱ्यांच्या बाराशे कोटी रुपये कर्जाची मात्र सक्तीने वसुली केली जात आहे. सरकारकडे शेतकऱ्याना घेणे असलेल्या १५४० कोटी रुपयामधून हे बाराशे कोटी वजा केले तरी सरकारकडेच आमचे ३४० कोटी रुपये येणे राहतात, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून सरकारने हे बाराशे कोटी रुपये काढून घेऊन आमचे ३४० कोटी रुपये परत करून एकदाचे चूकभूल देणे–घेणे करून घ्यावे.

'देशातील सुमारे दोनशे प्रमुख उद्योगावरील एकूण १८५० कोटी रुपये कर्ज माफ करण्याचा गुपचुप विचार केला जातो आणि शेतकऱ्यांचेच सरकारकडे ३४० कोटी घेणे असताना ४९ कोटीसाठी माफीची व उपकाराची भाषा वापरली जाते. कापसाची सातशे रुपये भावाची न्याय्य मागणी डावलून त्याला शंभर रुपये वाढ देऊन भीक देण्याचा प्रकार केला जातो. या सर्व गोष्टीचा जाब विचारण्याच्या निर्धाराने शेतकरी बंधूनी संघटित व्हावे व या 'आपल्याच' कार्यक्रमाला हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे ही विनंती.'

आता हा 'आपलाच' कार्यक्रम म्हणजे दर्यापूरच्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेला 'जागृत शेतकऱ्याचा भव्य मेळावा !'

या मंडळींनी ही सर्व आकडेवारी कुठून आणली होती, कुणास ठाऊक; पण ती शंभर टक्के खरी असल्याचा दावा दर्यापूर शेतकरी संघटनेचा प्रत्येक कार्यकर्ता छातीठोकपणाने करत होता.

¤

सभेला सुरुवात झाली. विदर्भ कापूस उत्पादक संघाचे चिटणीस डॉ. म. गो. बोकरे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. बोकरे हे विदर्भात मोठं प्रस्थ ! कापसाला रास्त भाव मिळावा, यासाठी गेली आठ–दहा वर्षं अर्थशास्त्राच्या मदतीनं शक्य होईल तेव्हा भांडणारे, शक्य होईल तेव्हा जुळवून घेणारे विद्वान गृहस्थ. सुरुवातीला त्यांनीच भाषण करून विदर्भातल्या कापूस-प्रश्नाची माहिती सांगितली. दर एकरी उत्पादन-खर्च जास्त, त्या मानाने कापसाचा उत्पन्न आणि मिळणारा भाव कमी हा शेतीतला सर्वसामान्य व्यस्त व्यवहारच डॉ. बोकऱ्यांनी आकडेवारीच्या साह्याने मांडला. भाषणाच्या शेवटी कापूस उत्पादक संघाने ठरविलेल्या आगामी आंदोलनाची रूपरेषाही सांगितली. हा कार्यक्रम असा होता.

(१) १० डिसेंबर १९८० रोजी सर्व शेतमाल बाजार बंद ठेवण्यात येतील,

(२) आपआपल्या भागातल्या ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांना शेतकऱ्यांच्या लढ्यात सहानुभूती म्हणून त्यांच्या पदाचे राजीनामे देण्याचे आवाहन शेतकरी त्यांच्या घरी जाऊन करतील.

(३) सर्व आमदारांना शेतकऱ्याच्या मागण्यावर आपण काय भूमिका बजावाल, हे विचारण्याकरिता घंटानाद करत त्यांच्या घरांवर मोर्चे काढले जातील.

(४) मंत्र्यांच्या कार्यक्रमावर संपूर्ण बहिष्कार टाकण्यात येईल.

(५) नागपूरच्या आमदार-निवासात शेतकऱ्यांच्या मागण्यांकरिता आमदारांचा पिच्छा पुरविण्यात येईल.

या संदर्भात शेतकरी संघाच्या वर्धा शाखेने जे पत्रक काढलं होतं त्याच्यावर सुरुवातीलाच लिहिलं होतं,-

'शेतकऱ्याची प्रतिज्ञा-

प्रत्येक शेतीमालाला उत्पादन-खर्चावर आधारित किफायतशीर भाव मिळविणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच !'

या शतकाच्या सुरुवातीला 'तेल्या-तांबोळयाचे पुढारी' म्हणून प्रसिद्ध पावलेला पुण्याचा एक मनुष्य शतक संपायला आलं तेव्हा विदर्भातल्या शेतकऱ्यांमध्येही घुसला होता.

¤

डॉ. बोकऱ्याच भाषण संपलं आणि शरद जोशींचं सुरू झालं. 'माननीय अध्यक्ष आणि माझ्या शेतकरी भावानो-' अशी सुरुवात करून जोशी बोलायला लागले. 'वीस नोव्हेंबरला विदर्भातल्या शेतकऱ्यांनी 'चक्का जाम' आंदोलन यशस्वी केल्याबद्दल मी त्यांना अभिवादन करण्यासाठी मुद्दाम विदर्भात आलो आहे,' असं सांगत जोशींनी वक्तृत्वाचं 'यशवंतरावस्टाइल' जाळं टाकलं आणि मग सुमारे एक तासभर शेतकरी संघटनेचा आर्थिक विचार आणि नाशिकच्या आंदोलनातले कडू-गोड अनुभव अतिशय सोप्या पद्धतीने सांगितले.

एव्हाना समुदाय अडीच-तीन हजारावर गेला होता आणि या समुदायाचं वैशिष्टच म्हणजे त्यामधले नव्वद टक्के शेतकरी होते. व्यासपीठाच्या उजव्या बाजूला पांढऱ्याशुभ्र कापसाच्या एखाद्या हिमशिखराप्रमाणे दिसणारा ढीग आणि समोर स्वच्छ उन्हात बसलेले हे अडीच-तीन हजार अर्धपोटी शेतकरी- दृश्य मोठं लक्षणीय होतं.

'आपण जर एकजुटीनं लढून आंदोलन यशस्वी केलं तर फक्त तीन वर्षांत शेतकऱ्याचं राज्य, शेतकऱ्यांचा बलवान समाज या देशात निर्माण होईल,' असं जोशींनी चढ्या आवाजात सांगितलं आणि टाळीची सम गाठली.

सभा संपली. असंख्य तरुण शेतकरी शरद जोशींभोवती जमा झाले. कोणी कुतूहलानं पाहायला, कोणी आपल्या काही शंका विचारायला, तर कोणी आपल्याही गावी येण्याचं शरद जोशींना निमंत्रण द्यायला ! व्यासपीठाशेजारीच जमिनीवर बसून बूट बांधत जोशी सगळ्यांशी बोलत होते. 'तरुण शेतकरी' ही गोष्ट माझ्यासारख्या शहरवासियाला नवीन होती. कारण शेतकरी म्हटलं की मळकं धोतर आणि डोक्याला टापर्स गुंडाळलेला, दाढीचे खुंट वाढलेला आणि चेहऱ्यावर लाचारीचं हसू पसरलेला एखादा म्हातारबोवाच आमच्या नजरेसमोर येतो. त्याच्या तारुण्यातली रग आम्हाला कधी दिसलेलीच नसते. शरद जोशींच्याभोवती हेच तारुण्याचं मोहोळ त्या दिवशी मावळतीच्या उन्हात जमलं होतं- नव्या आशा उरात घेऊन, नव्या विचाराचं वारं पिण्यासाठी !

¤

मैदानावरून पुन्हा ट्रॉलीतून श्रीकांतच्या घरी गेलो. दारात मेटॅडोर आली. आमच्या बॅगा मेटॅडोरमध्ये टाकल्या. शरद जोशी, लेफ्टनंट शंकरराव वाघ, मी आणि जोशींचा विदर्भदौरा आयोजित करणारे दहा-पंधरा तरुण कार्यकर्ते. त्यामध्ये श्रीकांत होताच, नागपूरचा विजय जावंधिया होता, 'अन्नदाता' या खास शेतकऱ्यांच्या पाक्षिकाचे संपादक प्रा. शरद पाटील हेही होते.

पुन्हा गप्पांना सुरुवात. शरद जोशी आणि लेफ्टनंट वाघ नाशिकच्या आंदोलनातल्या गमती सांगत होते. श्रीकांत, विजय आणि प्रा. पाटील 'चक्का जाम' चा लढा आणि त्या निमित्तानं विदर्भातल्या शेतकऱ्यांमध्ये होत असलेली नवी हालचाल याचा अहवाल देत होते.

विदर्भात वीस नोव्हेंबरला पार पडलेल्या या 'चक्का जाम' आंदोलनाबद्दल मला उत्सुकता होती, म्हणून प्रा. शरद पाटील यांना काही प्रश्न विचारले. त्यांनी आंदोलनाची चांगली माहिती सांगितली.

कापसाला सातशे रुपये भाव मिळावा या मुख्य मागणीसाठी महाराष्ट्र कापूस उत्पादक संघाने हे 'चक्का जाम'चं आवाहन केलं होतं. या दिवशी विदर्भात निरनिराळ्या ठिकाणी हजारो शेतकरी रस्त्यावर आले. त्या दिवशी रस्त्यावरून एकही एस. टी. धावली नाही. एवढंच नव्हे तर ट्रक, कार, मोटारसायकली इत्यादी खाजगी वाहनांचीही वाहतूक रोखण्यात आली. कित्येक ठिकाणी सायकलीनासुद्धा बंदी होती. दारव्हा इथे सुमारे दहा हजार शेतकऱ्यांनी रस्ता अडवला; पण जिथे शेतकऱ्यांची संख्या कमी पडली तिथे रस्त्यावर दगड, सिमेंटचे किंवा इलेक्ट्रिकचे खांब, झाड-झुडपं, इतकंच नव्हे तर डांबराची भट्टी आणि लाकडं टाकूनही रस्ते अडवले गेले. कोलुटा आणि वरकई इथे तर आंदोलकांनी रस्त्यावर भिंतच उभारली होती. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी बैलगाड्यांची चाकं काढून रस्त्यावर सोडून दिली. त्यामुळे सर्व वाहनांची चाकं जागच्या जागीच थांबली, जाम झाली.

पोलिसांनीही आंदोलकांना अटक करून गोळीबार-अश्रुधूर आणि बेछूट लाठीमार करून आंदोलनातला आपला वाटा नेहमीप्रमाणे उचललाच ! स्वतःला 'शेतकऱ्यांची मुलं' म्हणवणारे पंजाबराव कृषि विद्यापीठातले विद्यार्थीही या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांकडे पाहुणे म्हणून आलेल्यानाही पोलिसांनी आपला 'प्रसाद' दिला !

यामुळं नेमकं काय साधलं, याचं उत्तर प्रा. पाटील यांनी 'अन्न-

**तीन वर्षांत शेतकऱ्यांचं राज्य, शेतकऱ्यांचा बलवान समाज या देशात निर्माण होईल.**

दाता 'च्या एक डिसेंबरच्या आपल्या संपादकीयामध्ये दिलं आहे—

'या आंदोलनामुळ शेतकऱ्यांना आणि शेतमजुरांना केवळ एक संधी प्राप्त करून दिली आणि ठिकठिकाणच्या लहान–मोठ्या संघटनांच्या सहकार्यानं आंदोलनाला विराट स्वरूप मिळालं. हे आंदोलन सर्वस्वी स्वयंस्फूर्त होते आणि आपले प्रश्न यापुढं फक्त आपणच सोडवून घेऊ शकतो या जाणिवेतून ते निर्माण झाले होते. काहींना शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त असल्याचा अचानक साक्षात्कार झाला असला तरी आंदोलनाचा हा मार्ग योग्य नाही, असे वाटायला लागले आहे; पण आता कुणालाही शेतकरी–शेतमजुराकडे दुर्लक्ष करणे अशक्य आहे, ही गोष्ट या आंदोलनातून पूर्णपणे स्पष्ट झाली आहे.'

¤

आंजनगावला मेटॅडोर थांबली तेव्हा संध्याकाळचे सात वाजून गेले होते. इथल्या नगरपरिषदेच्या हायस्कूलच्या मैदानावर शरद जोशींची सभा आयोजित करण्यात आली होती. त्या लहानशा गावातही सभेला दीड–दोन हजार शेतकरी आलेले होते. आंजनगावच्या शेतकरी संघटनेनेही सभेचं निमंत्रण देणारं पत्रक काढलं होतं. कापसाला सातशे रुपये भाव मिळणं कसं आवश्यक आहे, हे सिद्ध करणाऱ्या या पत्रकात म्हटलं होतं—

'कापसाला सातशे रुपये भाव दिल्यास रुईचा भाव अठरा रुपये किलो पडतो.एक किलो रुईपासून कापड तयार करण्यास बावीस रुपये खर्च येतो आणिदहा मीटर कापड तयार होते. म्हणजेच चाळीस रुपयामध्ये दहा मीटर कापड तयार होते. हेच कापड बाजारात किमान सहा रुपये मीटर दराने विकले जाते. यातून आज जे मिलमालक कोट्यवधी रुपयांचा नफा घेत आहेत तो संपूर्ण पैसा शेतकऱ्याच्या घामाचा आहे हे सर्व जाणून घेण्याकरिता केंद्र सरकारने मिलच्या कापड-उत्पादनाच्या खर्चाचा अहवाल मिल-मालकाना सक्तीने जाहीर करण्यास सांगावा.

'ह्याकरिताच महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेले वाढीव भाव आम्हाला मान्य नाहीत. आम्ही देत असलेली माहिती सत्य स्वरूपाची आहे. महाराष्ट्र सरकार आणि विदर्भातील आमदारांनी विदर्भ शेतकरी संघटनेशी चर्चा करून या सत्यतेची जाणीव करून घ्यावी. त्यानंतर कृषी मूल्य आयोगाने उत्पादनखर्चानुसार भाव वाढवावे व तशी शिफारस केंद्र शासनाला करावी.'

¤

पुढली सभा आकोटच्या गांधी मैदानावर होती. आंजनगावला उतरल्यावर मेटॅडोर परत पाठवून दिली होती, त्यामुळे एका ट्रकमधून आकोटला जाऊन पोचलो.

सुरुवातीला शेतकरी संघटनेचे आकोटचे कार्यकर्ते केशव मेतकर यांनी शासनाने केलेली ४९ कोटींची कर्जमाफी आणि कापसाचे वाढवून दिलेले भाव म्हणजे काही शेतकऱ्यांवर उपकार नव्हेत, असं जोरदारपणे सांगितलं. 'शंभर रुपये चोरणाऱ्याने त्यातले वीस रुपये परत केले म्हणून आपण काही त्याचं अभिनंदन करत नाही,' असा एक दाखलाही त्यासोबत जोडून दिला.

सभेमध्ये शरद जोशी यांच्या भाषणापूर्वी नागपूरचे तरुण शेतकरी विजय जावंधिया यांचही भाषण झालं. आपल्या भाषणात ते म्हणाले-

'शेतकरी नेहमी कर्जातच जन्मतो, कर्जातच वाढतो आणि कर्जातच मरण पावतो, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. आपण कापसाचा खुला बाजार पाहिला, आणि कापूस एकाधिकार खरेदी योजनाही पाहिली. या दोन्हीमधून मिलवाल्याचा नफा वाढतो आहे, आपण मात्र आहोत तिथेच आहोत.

'मला बापजाद्यांची शेती मिळाली, घर मिळाले, त्या घराच्या भाड्यावर मी सुखानं जगतो, आरामात राहू शकतो. पण मी जर फक्त शेतीवरच जगायचं ठरवलं असतं तर आज इथे असं काही बोलायलाही येऊ शकलो नसतो.

'आज उत्पादनखर्च सर्वच बाजूंनी भरमसाठ वाढला आहे, महागाई वाढली आहे, खताचे भाव एका रात्रीत चाळीस टक्क्यांनी वाढतात, मग आमच्याच पोत्यामागे फक्त पाच–दहा रुपयांची वाढ का? आमचा शेतकरी म्हशीचं दूध स्वतःच्या कुटुंबासाठी ठेवूच शकत नाही. यांच्या गालावर लाली यावी म्हणून आम्हाला उपाशी ठेवलं जातं.

'अशा परिस्थितीत आपण सर्वांनी मिळून एकत्र आलं पाहिजे. जर टाटा–बिर्ला, किर्लोस्कर एकत्र येऊन आपल्या धंद्याच्या फायद्याचा विचार करू शकतात तर तुम्ही-आम्ही तसं का करू नये?'

विजय जावंधियाच्या भाषणाला अनुभवाची दमदार बैठक होती. श्रोत्यांकडूनही त्याना उत्तम प्रतिसाद मिळाला. या तरुण शेतकऱ्याचं व्यक्तिमत्त्वही 'शेतकरी' म्हटल्यावर डोळ्यासमोर उभ्या राहणाऱ्या पारंपारिक चित्रापेक्षा खूपच वेगळं आहे. सुमारे सहा फूट उंच, डोक्यावर कुरळ्या केसांचं इतकं दाट जंगल की शरद जोशी त्याला सत्यसाईबाबाच म्हणायचे! बोलण्यात सडेतोड, पण आतूनबाहेरून स्वच्छ. ऐषारामात राहण्यासारखी परिस्थिती असूनही त्याने हट्टानं शेती करणं सुरू केलं आणि त्याला सामान्य शेतकऱ्याच्या हलाखीची कल्पना आली. गेली पाच-सहा वर्षं या विषयावर तो अभ्यास करतो आहे. अनुभवाची जोड आहेच. त्याच्याच मदतीने शेतीच्या क्षेत्रातली ही कोंडी फोडण्याची त्याची धडपड आहे. या विषयाने तो इतका झपाटलेला आहे की ऐन आणीबाणीत त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण नागपूरला आले असता हा पठ्ठ्या एकटाच विमानतळावर गेला आणि 'कापसाला वाढीव भाव मिळाला पाहिजे' अशा त्याने मोठमोठ्याने घोषणा दिल्या. असा हा एकांडा शिलेदार आता आपल्या काही तरुण साथीदारासह कापसाच्या भावाचा प्रश्न तडीला लावण्याचा प्रयत्न करतो आहे. म्हणूनच शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी मुख्यमंत्री अंतुल्यांनी आणि केंद्रीय कृषिमंत्री राव बीरेंद्रसिंग यांनी चर्चा केली तेव्हा शरद जोशींनी विजयलाही बरोबर घेतलं होतं.

¤

पाच डिसेंबरला सकाळी पहिली सभा कारंज्याला होती. वेळ सकाळी नऊची; पण वाटेत गाडी नादुरुस्त झाल्याने, दुसरी गाडी मिळवून कारंज्याला पोचेपर्यंत आम्हाला अकरा वाजून गेले. तरीही तीन–साडेतीन हजार शेतकरी सभेच्या ठिकाणी ऊन खात बसलेले होते. सभेमध्ये शरद जोशींनी जोरदार भाषण केलं विदर्भातल्या या दौऱ्यात नाशिकच्या आंदोलनाचे अनुभव सांगणं, शेतकरी संघटनेचा शेतीच्या अर्थशास्त्रविषयीचा विचार शेतकऱ्यांना अतिशय सोप्या पद्धतीनं, त्यांच्या नेहमीच्या जीवनातले दाखले देत देत समजावून

सांगणं आणि लढ्यासाठी उभं राहण्याची जिद्द त्यांच्या मनात निर्माण करणं असे तीन प्रमुख हेतू मनात ठेवून जोशींनी आपल्या भाषणाची रचना केलेली होती. हेच विचार त्यांनी नासिकला ऊस-आंदोलन उभे करण्यापूर्वी आणि प्रत्यक्ष लढ्याच्या काळातही तिथल्या शेतकऱ्याना वारंवार सांगितले होते.

कारंज्याच्या या सभेत तिथल्या कृषी विकास मंडळाच्या सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर झालेला एक ठरावही वाचून दाखविण्यात आला. या ठरावात म्हटलं होतं—

'शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या प्रश्नांना वाचा फोडून शेतकऱ्यांना संघटित करण्याचं संपूर्ण श्रेय श्री. शरद जोशी यांनाच आहे. त्यानी केलेल्या अपूर्व अशा नेतृत्वाबद्दल कृषी विकास मंडळ त्यांचे अंतःकरणापासून अभिनंदन करतो तसेच श्री. शरद जोशी हेच आमचे नेते म्हणून जाहीर करते. विदर्भ विभागातील इतर सर्व शेतकरी संघटनानासुद्धा आमची अशी जाहीर विनंती आहे की, त्यानीसुद्धा श्री. शरद जोशी यांना आपले नेते म्हणून जाहीर करावे.

'कृषी विकास मंडळाच्या सर्वसाधारण सभेत शेतकऱ्यांच्या बाजूने वाटाघाटी करण्यासाठीही श्री. शरद जोशी याना अधिकृत नेते म्हणून संपूर्ण अधिकार देण्यात आले. त्यांना आम्हा शेतकऱ्यांसाठी शासनाशी वाटाघाटी करण्याचा पूर्ण अधिकार राहील.'

¤

कारंज्याहून जेवून निघालो. दुपारी तीन वाजता यवतमाळला सभा होती. *अर्थात सकाळी कारंज्यालाच यायला उशीर झाल्याने* यवतमाळलाही पोचायला उशीर होणं स्वाभाविक होतं. त्यातच वाटेमध्ये दारव्हा इथे शेतकऱ्यांनी रस्त्यावर येऊन आमची गाडी अडवली. जवळच्याच एका सिनेमा-टॉकीजमध्ये शरद जोशींची छोटीशी सभा शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तपणे आयोजित केली होती. या सभेला आणखी एक महत्त्व असं होतं की, वीस नोव्हेंबरच्या 'चक्का जाम' आंदोलनात दारव्हाच्या परिसरातील सुमारे दहा हजार शेतकऱ्यांनी भाग घेतला होता. सबंध वर्ध्यामध्ये फक्त या ठिकाणी पोलिसांनी हवेत गोळीबाराच्या फैरी झाडल्या. या वेळी निदर्शक व पोलीस याच्यामध्ये झालेल्या चकमकीत तीस-चाळीस जण जखमीही झाले. त्यामुळे या ठिकाणी थांबून तिथल्या शेतकऱ्यांना भेटणं, त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देणं अगत्याचं होतं. शरद जोशींनी ते काम चोखपणानं पार पाडलं.

¤

दारव्हाच्या शेतकऱ्यांचा निरोप घेऊन निघालो ते यवतमाळला पोचेपर्यंत संध्याकाळचे पाच वाजून गेले. नियोजित वेळेपेक्षा दोन-तीन तास उशीर झाला होता. यवतमाळच्या नगरपरिषद भुवनात सभा होती. सभागृह तुडुंब भरलेलं. बाहेरच्या हिरवळीवर अनेक माणसं बसलेली. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते मात्र शरद जोशी आलेच नाहीत तर एवढ्या लोकांना कसं तोंड द्यायचं या विवंचनेत!

नगरपरिषदेचा परिसर अतिशय रम्य. तीन बाजूना लांब-रुंद रस्ते असलेल्या ठिकाणी एखाद्या त्रिभुज प्रदेशात असावी तशी परिषदेची टुमदार इमारत. परिषदेच्या उजव्या हाताला लोकमान्य टिळकांचा भव्य पुतळा. शेजारीच १९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामात आत्मार्पण केलेल्या यवतमाळ परिसरातील वीरांची नावं कोरलेले दोन संगमरवरी स्तंभ!

सभा सुरू झाली आणि काही माणसं श्रोत्यांमध्ये कसली तरी पिवळ्या रंगाची चतकोर कागदावर छापलेली पत्रकं वाटायला लागली. शरद जोशींनी त्या माणसांना आपलं भाषण संपल्यावर पत्रकं वाटायला सांगितलं. तोपर्यंत एक पत्र जोशींच्याही हातात आलं होतं.

जोशींचं भाषण संपलं. पत्रकांचं वाटप पुन्हा सुरू झालं. शरद जोशींनी स्वतःच्या हातातलं पत्रक घेऊन माईकवरून मोठ्यानं वाचायला सुरुवात केली— वरती ठळक अक्षरात, मोठ्या टाइपात लिहिलं होतं—

'शरद जोशी जाब द्या!

केवळ वैदर्भीयच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील कास्तकारांचे व्यापक हित लक्षात घेऊन डाव्या आघाडीच्या वतीने निघणाऱ्या दिंडीला आपला विरोध का?

ऊस आणि कांद्याच्या प्रश्नावर आपण तुरुंगवास भोगला. कापसाच्या प्रश्नावर वैदर्भीय कास्तकार संघटित होत असताना हा अवसानघातकीपणा का आणि कोणासाठी?

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुले यांच्या प्रशंसेचा पुळका कशासाठी?'

पत्रकाखाली देवीदास भोरे, सरचिणीस, अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक आणि कमलकिशोर चोरडिया, अध्यक्ष, माथाडी कामगार संघटना, यवतमाळ, अशा दोन सह्या.

सभागृहात एकदम शांतता पसरली. आता शरद जोशी काय बोलणार?

'पत्रकातला एकेक प्रश्न घेतो आणि जाहीरपणानं विचारलंय आहे, म्हणून जाहीरपणानं स्पष्ट उत्तरं देतो!' शरद जोशी म्हणाले—

'डाव्या आघाडीच्या शेतकरी दिंडीला मी विरोध दर्शवलेला नाही आणि माझा पाठिंबाही नाही, पण माझं असं स्पष्ट मत आहे की शेतकऱ्यानी एवढं तीन-चारशे मैल चालूनही मुख्यमंत्र्याना एक कागद देण्यापलीकडे यातून फार काही साध्य होणार नाही. माझ्या तंत्रात हे बसत नाही. आंदोलनातला कोणताही डाव आखताना शेतकऱ्यांना कमीत कमी श्रम आणि जास्तीत जास्त परिणाम, हे माझं तंत्र असतं.

'शेतकऱ्यांचा अवसानघात मी कधीही केलेला नाही. उलट माझं असं मत आहे की, इंदिरा कॉंग्रेससकट सर्व राजकीय पक्ष शेतकरी-विरोधी आहेत. डाव्या आघाडीच्या या शेतकरी दिंडीबद्दल मी एवढंच म्हणेन की, गावची जत्रा भरलीच आहे, शेजारी पाल टाकली तर आपलाही धंदा चालेल या आशेनं राजकीय पक्षानी हा उद्योग चालू केला—' सभागृह टाळ्यांच्या कडकडाटात बुडून गेलं.

'मुख्यमंत्री अंतुल्यांचा पुळका मला नाही. त्यांची प्रशंसा मी

**'शासनाशी वाटाघाटी करण्याचा पूर्ण अधिकार श्री. शरद जोशी यांनाच राहील!'**

कधीही केलेली नाही तशी करण्याचं मला कारणही नाही आताच तुम्ही माझं भाषण ऐकलं. मुख्यमंत्र्यांचं कौतुक करणार एकही विधान मी केलेलं नाही!'

टाळ्यांच्या गजरात सभा संपली. जोशींच्याभोवती चाहत्याचा आणि पत्रकाराचा गराडा पडला. यवतमाळच्या भूविकास बँकेचे अध्यक्ष हिरवळीवर खास खुर्ची टाकून भाषण ऐकत बसले होते. कडक इस्त्रीचं धोतर, झब्बा, जाकीट आणि तशीच कडक टोकाची टोपी, डोळ्यांवर सोनेरी काडीचा चष्मा, हातामध्ये काठी. वय पन्नाशीच्या पुढं असावं. शेजारीच एक तरुणही बसलेला. बहुधा मुलगा असावा. दोघेहीजण कट्टर इंदिरावादी. भाषण ऐकता ऐकता बाप मध्येच पोराकडे पाहून गालातल्या गालात हसायचा पलीकडे जोशींच्या एका तासाच्या भाषणाच्या नोटस् घेण्यासाठी एल. आय. बी. ची चार माणसं बसलेली. त्याची बिचाऱ्यांची फारच त्रेधा उडत होती.

यवतमाळहून हिंगणघाटला निघालो. पोचेपर्यंत नऊ वाजून गेले. तिथेही कार्यकर्त्यांची फोनाफोनी आणि पळापळ सुरू झालीच होती. गावातल्या आबेडकर पुतळ्याजवळ सभा होती. त्याच परिसरातले काँग्रेस (अरस) चे एक माजी आमदार सभेच्या अध्यक्षस्थानी. सबंध चौकभर श्रोते पसरलेले. वाहतूक पूर्णपणे बंद!

शरद जोशींचं भाषण सपल आणि माजी आमदार बोलायला उठले. त्यांनी पक्षाच्या प्रचाराचंच कार्य सुरू केलं अध्यक्षाचं भाषण चालू असतानाच जोशी व्यासपीठावरून उठले. खाली उतरून बूट बांधले आणि चालायला लागले. श्रोतेही पांगले. आमदारसाहेबाचं भाषण चालूच होतं. माइकवरून आवाज चढवून आमदार कसल्याशा 'लढ्या'चं आवाहन करत होते, पाच-पंचवीस जण त्यांच्यापासून दोन फुटावर भोवताली कोंडाळं करून उभे राहिले होते. बहुधा आमदाराच्या पायांखाली त्यांची सतरंजी अडकली असावी!

¤

हिंगणघाटहून रात्री मुक्कामाला वर्ध्याला आलो. रवी काशीकर हे वर्ध्यातले एक खताचे व्यापारी. त्यांची थोडी बागायती शेतीही आहे. रात्री त्यांच्या मळ्यावरच मुक्काम होता.

रात्रीचा एक वाजायला आलेला. मळ्यावर होळीसारखी मोठी शेकोटी पेटली होती. हाता-पायाना ऊब आणत थट्टा-मस्करी चालू होती. थोड्याच वेळात जेवायची पंगत बसली. जेवणानंतर त्या भागातल्या तरुण कार्यकर्त्यांशी अनौपचारिक चर्चा. इतकी अनौपचारिक की जो तो आपापल्या अंथरुणात बसून मानेपर्यंत दुलई ओढूनच बोलत होता.

रात्री झोपायला साडेतीन वाजले; पण पुन्हा सात वाजता उठलो. कारण जवळच्याच एका लहानशा गावात सकाळी आठ वाजता शरद जोशींची सभा ठेवली होती.

जाताना वाटेत डाव्या हाताला 'पूज्य' विनोबाचा अश्रम दिसला. मनात एक कुतूहल आणि अनेक प्रतिक्रियाचं मिश्रण उचंबळून आल. विनोबाची भेट घेण्याचा शरद जोशीना लटका आग्रहही करून पाहयला; पण 'तुम्हाला बातमी मिळावी म्हणून का भेट घेऊ? तुमचा डाव माझ्या लक्षात आला नाही अस समजू नका!' असं हसत हसत म्हणत जोशींनी विषयांतर केलं.

गावच्या वेशीपाशी सुदर कमान उभारली होती. कुंकुमतिलक लावून जोशींचं स्वागत झालं.

सभेच्या ठिकाणी पोचलो आणि तिथलं वातावरण पाहून मला एकदम 'माय फेअर लेडी' या अप्रतिम चित्रपटाची आठवण झाली. एखाद्या लहानशा गावात सकाळ कशी होते याचं अत्यंत उत्कृष्ट चित्रण त्या सिनेमात काही 'स्टिल्स'च्या साह्यानं केलेलं आहे. त्या चित्रणात आणि इथल्या वातावरणात फरक फक्त काळाचा आणि मातीचा होता.

गाव कसलं? छोटीशी वाडीच होती. सकाळी आठला पुण्यासारख्या शहरातही सभा होत नाही, मग या वाडीवर कशी होणार, अशी चिंता मी वारंवार व्यक्त करत होतो आणि शरद जोशी सांगत होते—'चार माणसं भेटली तरी त्याना शेतकरी संघटनेचा विचार सागू आणि परत येऊ.' दोन वर्षांपूर्वी मावळ तालुक्यात आडगावी सायकलवरून भटकत, शेतकऱ्याना गोळा करत हिंडणाऱ्या जिद्दी कार्यकर्त्याचा हा उद्गार होता.

सभा सुरू झाली. पुढली सतरंजी लहान पोरांनीच बळकावली होती. मोठी माणसं मागं जमिनीवरच बसली होती. रात्री पेटवलेल्या शेकोटीच्या राखेतून अजून धूर येतच होता. कोणी मजेत चिलीम फुंकत, सकाळचं कोवळं ऊन अगावर घेत भाषण ऐकत होते.

शरद जोशींचं भाषण सपलं. दौऱ्यात इतर सभामध्ये शेतकरी सघटनेचा जो आर्थिक विचार आणि आदोलनाचा अनुभव शरद जोशी सागत होते तोच त्यांनी इथंही सूत्ररूपानं, पण तितक्याच तळमळीनं सागितला सभा संपली. एव्हाना त्या छोट्याशा वाडीवरही दोन-तीनशे माणसं सहज जमली होती. भाषणानंतर चहा पिता पिता भोवताली जमलेल्या तरुणाना शरद जोशी सागत होते—'माझ्या किंवा तुमच्या बापाच्या पिढीची माणसं तुम्ही जमेला धरूच नका. आम्ही सर्वचजण केव्हा ना केव्हा, कुणाचे ना कुणाचे लाचार झालेलो आहोत. हा लढा आता तुम्ही तरुण पोरानीच पुढं न्यायचा आहे.' बोलत बोलत जोशींनी शेजारी उभ्या असलेल्या एका तरुणाच्या पाठीवर थाप मारली आणि आम्ही गाडीकडे चालायला लागलो.

लगेच साडेनऊ वाजता वर्ध्याला जाहीर सभा होती. वर्धा हे जिल्ह्याचं ठिकाण. त्यामुळं सभेला शेतकरी फारसे नव्हतेच. सुशिक्षित मध्यमवर्गीयांचाच भरणा सर्वांत जास्त. वर्ध्यातल्या मुख्य रस्त्यावरच सभा सुरू झाली. दोन्ही बाजूंना दोन-दोन चौक वाहतूक पूर्णपणे बंद. आपल्या भाषणाच्या शेवटी शरद जोशी म्हणाले—

'आज जेव्हा मी देशात निरनिराळ्या ठिकाणी शेतकऱ्यांमध्ये होत असलेली जागृती पाहतो तेव्हा एकच गोष्ट मला जाणवते—आता शेतकऱ्याचा काळ आला आहे. या प्रवाहाला आता कुणीही रोखू शकणार नाही! या प्रवाहावर अनेक बुडबुडे आहेत—शरद जोशी अशांपैकीच एक आहे.'

भाषणानंतर रवि काशीकरच्या घरी गेलो. अतिशय तळमळीच्या या गृहस्थाकडलं आगत-स्वागतही पाहुण्यासारखं होतं. प्रसगी स्वतःच्या कुटुंबियाना अडचण सोसायला लावून तो संघटनेच्या कामात मदत करत होता.

¤

दुपारी दोन वाजता आर्वीला सभा होती; पण वर्धा-आर्वी-मार्गावर तीन-चार ठिकाणी तरी लहान लहान गावांपाशी शेतकरी मोटारीसमोर आडवेच आले. शरद जोशी आपल्या गावावरून पुढे जाणार असल्याची वार्ता त्यांच्यापर्यंत कशी पोचली होती कुणास ठाऊक. जोशींना कोणीच पाहिलेलं नव्हतं. त्यामुळं गाडी थाबल्यावर आत बसलेल्यापैकी शरद जोशी कोण, अशा बुचकळयात ते पडायचे. हातातला हार घट्ट धरून जोशींच्या शोधात धावणाऱ्या त्या शेतकऱ्याची धावपळ पाहून थोडी करमणूकही व्हायची. विदर्भात बहुतेक ठिकाणी कापसाचे हार दिले जातात.एका गावानं मात्र चागली कल्पना लढवून कादा, ऊस व कापूस एकत्र गुफलेला हार दिला!

या 'वैदर्भीय' आगत-स्वागतातून कशीबशी सुटका करून घेत आर्वीला पोचलो तेव्हा संध्याकाळचे पाच वाजायला आले होते.

गावात अनेक ठिकाणी स्वागताच्या उत्कृष्ट कमानी उभारल्या होत्या. बॅनरं फडकत होती. सभेचं व्यासपीठही उत्तम उभारलं होतं. साडेचार-पाच हजारांची तरी सभा असावी. सभेत शरद जोशींना शालही देण्यात आली. सभेनंतर लेफ्टनंट वाघांनी लगेच तिचा ताबा घेतला, हे सांगणं नकोच. अर्थात शाल एवढी मोठी होती की, पुढल्या सर्व प्रवासात गाडीमध्ये मागल्या सीटवर बसून मी, वाघ आणि शरद जोशी असे तिघंही जण मिळून ती पाघरत होतो. शालीची टोकं मी आणि जोशी एकेका बाजूनं धरायचो, मध्ये लेफ्टनंटसाहेब घोरायला लागलेले असायचे.

आर्वीहून काटोलला जाताना वाटेत पुन्हा गाडी अडवली गेली. गॅसबत्त्यांच्या उजेडात फारसं काही दिसतही नव्हतं. रात्रीचे आठ वाजून गेले असावेत. गाडीतून खाली उतरलो. डाव्या हाताला एक लहानसा मंडप उभारला होता. 'शरद जोशी झिंदाबाद'च्या घोषणा देत जमावानं जवळजवळ ढकलतच जोशींना मंडपापाशी नेलं. आर्वी तालुका शेतकी आणि बागायतदार संघटनेतर्फे तिथं साखळी उपोषण होत. कारण होतं कारंज्याच्या वीज बोर्डातल्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारी वर्तनाचं. लहानशा गावात मीटर बसवून हवा असेल तर अतिशय रखडावं लागतं. कित्येक वेळा अधिकाऱ्यांना शंभर-दीडशे रुपये लाचही द्यावी लागते. 'या भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची बदली करा!' अशीच मागणी करून शेतकऱ्यानी मूळ मुद्यालाच हात घातला होता. आपल्या शेतावर मीटर येण्यापेक्षाही अशा अधिकाऱ्यांचीच उचल-बागडी करण्याची त्यांची इच्छा होती.

आम्ही मंडपात गेलो. नीळकंठ पुडलिकराव भिसे आणि व्रिजमोहन किसनलाल टावरी असे दोन तरुण उपोषणाला बसले होते. शरद जोशींनी त्यांचं अभिनंदन केलं. दोघांच्याही चेहऱ्यावर नवी टवटवी आली. शेतकऱ्यासाठी आठ-आठ दिवस उपोषण करणारा 'स्वजातीय' भेटल्याचा आनंद सर्वांच्याच चेहऱ्यावर दिसत होता.

हा सर्वच अनुभव अनोखा होता. ज्यानी शरद जोशींचा यापूर्वी कधी फोटोसुद्धा पाहिलेला नव्हता अशी विदर्भातली वरवर अडाणी वाटणारी मंडळी शरद जोशींचा हात हातात घ्यायला, त्याचे शब्द ऐकायला आतुर होत असायची. तुम्ही आता विदर्भातच या आणि आमच्या कापसाचा प्रश्न हाती घ्या, असे आग्रह करून सागायची. गाडीपर्यंत पोचवायला यायची. गाडी दिसेनाशी होईपर्यंत झिंदाबादच्या घोषणा देत राहायची. या प्रकाराला काय म्हणावं? कुणासाठी तरी, कशासाठी तरी स्वत:ला झोकून देण्याच्या वृत्तीचा तर हा भाग नसेल? भारतातसुद्धा अवघ्या चार वर्षांपूर्वी आलेल्या या साहेबाची वऱ्हाडाच्या अंतर्भागातल्या शेतकऱ्याशी इतकी डायरेक्ट वेव्ह लेंग्थ कशी जुळली असेल?

शिवाय कालपर्यंत 'माय-बाप,-माय-बाप' करत कुणापुढही लाचारीनं पदर पसरणाऱ्या या अर्धपोटी जीवांमध्ये भ्रष्टाचारी, उन्मत्त अधिकाऱ्याविरुद्ध उभं राहण्याची धमक कशी निर्माण झाली असेल? शरद जोशी म्हणतात तसं, शेतकऱ्याचा काळ आला आहे हेच खरं असावं!

रात्री काटोलची सभा आटोपून नागपूरला आलो. इथे विजय जावंधियाचं घर आहे. त्यामुळे त्याच्याचकडे मुक्काम. विजयची आई आणि पत्नी मात्र अत्यंत आतिथ्यशील! मध्यरात्रीच्या थंडीत त्या दोघींनी दहा-बारा कप चहा केला आणि सर्वांना आग्रहाने पाजला!

सकाळी आठ वाजताच बाहेर पडलो. आमदारनिवासात एका छोटया हॉलमध्ये पन्नास-पाऊणशे विद्यार्थी जमले होते. बहुतेक सर्वांच्या घरी शेती. त्यामुळे शेतकऱ्याच्या प्रश्नाची सगळयाना पूर्ण जाणीव आणि त्यावर उपाय शोधण्याचीही धडपड. त्यामुळे या तरुण शेतकऱ्यांनीच एकत्र येऊन संघटना स्थापन केली- विदर्भ विद्यार्थी कृषक संघटना!

सुरुवातीला शरद जोशींनी छोटंसं निवेदन केलं. शेतकरी संघटनेचा आर्थिक विचार माडताना श्री. जोशी म्हणाले,

**'शेतकऱ्यांचं शोषण न होता जलद आर्थिक विकास होऊ शकतो हे सिद्ध करण्यासाठी हा लढा आहे. महात्मा फुल्यांनी शेतकऱ्यांच्या आसुडाविषयी जे सांगितलं त्यामध्ये व आज मी जे काही सांगतोय त्यामध्ये काहीही फरक नाही. फक्त फुल्यांनंतर हा विचार प्रथमच पुढे येत आहे आणि मी तो अर्थशास्त्रीय परिभाषेत मांडतो आहे.**

**'एक ऐतिहासिक महत्त्वाचा लढा आपण लढतो आहोत. यामधून जगाच्या आर्थिक जडणघडणीला नवी दिशा मिळणार आहे.'**

निवेदनानंतर प्रश्नोत्तरही झाली. एक प्राध्यापक मेळाव्याला उपस्थित होते. प्रश्न विचारायच्या हेतूनं ते उभे राहिले आणि त्यानी ब्यूरॉक्रसी व टेक्नॉक्रसी ही आजची भटशाही किंवा भिक्षुकशाही आहे. सरकारी नोकरीतसुद्धा क्लास-वन, क्लास-टू च्या रूपानं चातुर्वर्ण्य घुसलेलं आहे. आमच्या देशाला मिळालेला हा शाप आहे. या परिस्थितीवर मात केल्याशिवाय इतर प्रयत्न कुचकामी ठरतील, असं एक छोटंसं भाषणच ठोकलं. शेतकऱ्याचा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी देशातल्या सर्व शेतजमिनीचं राष्ट्रीयीकरण झालं पाहिजे, असा स्वत:ची विचारसरणी उघड करणारा उपायही प्राध्यापक-

**'या लढयातून जगाच्या आर्थिक जडणघडणीला नवी दिशा मिळणार आहे'-शरद जोशी**

महाशयांनी सुचवून टाकला. यावर भाष्य करताना शरद जोशी म्हणाले–

'बोलताना आपण काही शिक्के वापरतो आणि या शिक्क्यांनी भल्याभल्यांना बनवलं आहे. आपण परिस्थितीचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे, देशाच्या परिस्थितीबाबत स्वत:चे निष्कर्ष काढले पाहिजेत आणि मग जर आपला विचार आणि मार्क्सच्या एखाद्या विचारात साम्य आढळलं तर एवढंच म्हणावं की, 'मार्क्स भला माणूस असला पाहिजे!'

'डाव्या विचारसरणीतल्याही नव्या पोथीनिष्ठतेपासून किंवा भटशाहीपासून आपण सावध राह्यलं पाहिजे. समाजवादी अर्थव्यवस्था हवी, मिळकत–स्थावर जंगम–यावर निमंत्रण हवं, शेतजमिनीचं राष्ट्रीयीकरण करावं असं म्हणताना आपण एका नव्या टेक्नॉक्रसीला ब्यूरॉक्रसीला–नव्या भटशाहीला आणि भिक्षुकशाहीला–निमंत्रण देत आहोत हे विसरून चालणार नाही!'

प्राध्यापकमहाशयांचा चांगदेव झाला होता. शेतकऱ्यांची पोरं खूष झाली होती.

¤

आमदार निवासातून बाहेर पडलो. नागपूर पत्रकार संघाने शरद जोशींशी वार्तालाप आयोजित केला होता. जोशींनी आपल्या नेहमीच्या शैलीनं रोख-ठोक उत्तरं दिली. एका पत्रकारानं खोचक प्रश्न विचारला– 'शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा म्हणून तुम्ही लढा पुकारता आणि तुम्ही ज्या गाडीतून सध्या आला आहात ती एका शेतकऱ्याचीच आहे, हे कसं काय?'

शरद जोशींनी शांतपणे विचारलं–'शेतकरी म्हटल्यावर सरकारी जाहिरातीत असतो तसा हातात कणसं घेतलेला अर्धनग्न माणूसच तुम्हाला दिसतो का? शहरातल्या कारकुनानं साधी स्कूटर घेतली तर आपण त्याचं कौतुक करतो, मग आमच्या शेतकऱ्यानं मोटारसायकल घेतली किंवा गाडी ठेवली तर बिघडलं कुठं? उलट त्याला तसं करता यावं यासाठीच आम्ही हा लढा उभारला आहे!'

पत्रकार परिषदेनंतर विदर्भातल्या पाच जिल्ह्यामधल्या शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठक होती. वीस–पंचवीस तरुण जमले होते. दीड तासाच्या चर्चेनंतर पाच जिल्ह्यांची मिळून एक समन्वय समितीही स्थापन करण्यात आली. शरद जोशींना संघर्षाचे नेते म्हणून मान्यता देण्यात आली. तरुणांचा तो भारलेला जथा पाहून कोणाही धंदेवाईक पुढाऱ्याच्या तोंडाला पाणी सुटलं असतं!

विजयकडेच दुपारचं जेवण झालं. नंतरची सभा सावनेरला होती; पण तत्पूर्वी 'अन्नदाता' या शेतकऱ्यांच्या पाक्षिकाचे संपादक प्रा. शरद पाटील याच्या घरी गेलो. प्रा. पाटील हे नागपूर विद्यापीठात वृत्तविद्या विभागात शिकवतात. अनेक प्रकारच्या अडचणी येऊनही 'अन्नदाता' या केवळ शेतकऱ्याचे विषय आणि प्रश्न हाताळणाऱ्या पाक्षिकाची वाटचाल त्यांनी नेटाने चालू ठेवली आहे. त्यांच्या पत्नी सौ. ओजस्विनी पाटील याचाही या कार्यात मोठा सहभाग आहे.

सावनेरच्या भालेराव हायस्कूलवर सभा होती. तिथल्या शेतकरी संघर्ष समितीतर्फे त्या दिवशी संपूर्ण दिवसभरच एक शेतकऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. 'सावनेर तालुका शेतकरी संमेलन!'

संमेलनाच्या ठिकाणी पत्रकं वाटली जात होती–

'शेतकरी बंधूनो,

'आपल्याला स्वातंत्र्य मिळून ३४ वर्षे झालीत. देश प्रगतीच्या दिशेने अग्रेसर होत आहे; परंतु या प्रगतीच्या वेगात जो मोलाची कामगिरी बजावत आहे तो देशाचा आधारस्तंभ शेतकरी आज दीन अवस्थेत आहे व दिवसेदिवस दुबळा होत आहे. यामधून शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी म्हणून शेतीमालाला उत्पादन–खर्चावर आधारित भाव द्या, ही मागणी आपण सातत्याने शासनाला करत आहोत. या मागणीसाठी आपण 'रस्ता रोको' आंदोलन केले. शासनाने आमच्या तोंडावर तुकडे फेकून आमच्या आंदोलनातील हवा काढून टाकण्याचा प्रयत्न केला.

'आता आपल्याला संघर्ष करावा लागणार आहे आणि तोसुद्धा रस्त्यावर येऊन. आपण संघटित होणे ही काळाची गरज आहे. आपण आज एक झालो नाही तर अन्यायाची क्रूर तलवार आपल्यावर चालल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्यांना संघटित, जागृत करण्यासाठी, आपले प्रश्न समजावून घेण्यासाठी हे संमेलन होत आहे. शेतकऱ्याला आंदोलनाची दिशा निर्देश करण्याकरिता, शेतकरी चळवळीचे प्रणेते, कापूस उत्पादक संघाचे सरचिटणीस डॉ. म. गो. बोकरे हे उपस्थित राहणार आहेत.

*'त्याचप्रमाणे नाशिक आंदोलनाचे प्रणेते, युवा, तडफदार किसान नेते मा. शरद जोशी यांची प्रमुख उपस्थिती आहे.*

*'या! संघटित व्हा! आणि आपला आवाज बुलंद करा.'*

पत्रकाखाली 'आपले नम्र' म्हणून मोजून ५७ जणांची नावे होती. कोणता तरी एखादा गट दुखावल्यामुळं संघटनेला तडा जाऊ नये म्हणून ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची चालणारी ही धडपड मनोरंजक असते. इतकं कशाला, शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांच्याबरोबर तीन–चार वेळा बारामती भागात गेलो होतो. तेव्हाही ग्रामीण भागात सभेला सुरुवात करताना पवारसाहेब उपस्थितांच्या नावाची जी यादी सुरू करायचे ती दोन–दोन मिनिटं चालू राह्यची. बऱ्याच वेळा वाटायचं की आता फक्त आपलंच नाव घ्यायचं राह्यलं असेल!

¤

सावनेरहून निघालो तेव्हा दोन पोलीसव्हॅन्स, दोन जीप्स उभ्या होत्या. पोलीसइन्स्पेक्टर, एल. आय. बी. वाले मन लावून भाषण ऐकत होते. त्यांच्याही नकळत दाद देत होते. एका एल. आय. बी. वाल्याने आमच्या गाडीच्या ड्रायव्हरला – अहमदला टॅब करायचा प्रयत्न केला. *'क्या, साब आगे कहाँ जानेवाले है?'* पण पोरगं हुषार निघालं. म्हणालं– 'हमे क्या मालूम? साब मीटिंग खतम करके गाडीमें आकर बैठते है और तब बताते हैं-- अब इधर चलो! हमें क्या करना? जहाँ बोलेंगे वहाँ ले जाना!'

सावनेरहून वरूडला जायचं होतं. घनदाट जंगलाचा सुंदर रस्ता. तिन्हीसांज टळून गेलेली. गांधीजीचे सत्याचे प्रयोग, खरं प्रेम कोण करू शकतं, काव्यातली मजा किती अशा वाट्टेल त्या विषयावर गप्पा भरात आल्या होत्या. प्रेमाबद्दल बोलताना शरद जोशी म्हणत होते– 'आपण कधी पाऊस केव्हा पडेल म्हणून ढगाकडे डोळे लावून बसत नाही. ढग खाली खेचून आणतो.' लेफ्टनंट वाघ आपल्या

खास शैलीत म्हणाले, 'अरे, आपण गळ-गांडूळ घेऊन तासनतास बसून राहात नाही. नुसतं तळ्याच्या कडेनं चालायचं. मछली आपोआप बाहेर उडी मारून येते ' कविता आणि प्रेयसीचं नातं सांगताना मी म्हणालो– 'To read a poem is to love a girl, and to analyse it, is to marry her.'

गाडीत हास्याचा कल्लोळ उठला. विजय, श्रीकांत, शरद जोशी सगळेचजण त्यामध्ये सामील झाले.

□

वरूडला पोचण्यापूर्वी कुठे तरी चहा पिणं आवश्यक होतं. एका हॉटेलात गेलो. पोऱ्यानं बोटं आतपर्यंत बुडवून आणलेली पाण्याची ग्लासं टेबलावर आदळली. टेबलावर एक कुठल्या तरी वर्तमानपत्राची पानं राहूयली होती. कुणी तरी सहज अंक हातात घेतला. 'अपनी लडाई खुद लड रहे महाराष्ट्रके किसान' हा मथळा होता. 'नई दुनिया' या मध्यप्रदेशातून निघणाऱ्या दीड लाख खपाच्या दैनिकाचा तो अंक होता. त्याच दिवशीचा– ७ दिसंबर १९८० ! श्री. रनवीर सक्सेना नावाच्या पत्रकाराने शरद जोशीच्या नाशिक-आंदोलनावर दैनिकाचं संपूर्ण पानभर फीचर केलं होतं. उजव्या कोपऱ्यात शरद जोशी एका वृद्ध शेतकऱ्याच्या हातून मुसंब्याचा रस घेऊन उपोषण सोडतानाचा तीन कॉलमी फोटो होता. शिवाय रस्ते, रेल्वेमार्ग रोखण्याचे आणि त्यामुळे अडकून पडलेल्या प्रवाशांना भाकरी–चटणी मोफत पुरवणाऱ्या शेतकऱ्याचे चार–चार कॉलमी फोटो होते.

आंदोलन–काळात सक्सेनासाहेबांनी स्वतः नासिकला चार दिवस तळ ठोकला होता. लेफ्टनंट बाघानी त्यांना मोटरसायकलवरून, जीपमधून भरपूर घुमवलं होतं. या लढ्याबद्दल आपल्या छोटघाशा प्रस्तावनेत सक्सेनासाहेब म्हणतात,

'आजाद भारतमें वेतन–भोगियोने मूल्य–सूचकाकके सायेमें अपना सरक्षण कमोवेश करा लिया है। कारखानदारोंको ऐशोआराम जुटानेके सैकडो रास्ते मालूम है। मगर खेतीप्रधान भारतमें किसान और कृषि मजदूर अबतक आश्वासनोके भरोसे जिंदा रहा। महाराष्ट्रके किसान, जो प्याज, गन्ना और कपास बहुत उपजाते है, वर्षोंसे महसूस कर रहे थे कि लेवीके माध्यमसे उन्हें लूटा जा रहा है। हालहीमें एक भूतपूर्व आय. ए. एस. अफसर शरद जोशी उनके बीच तारणहारके रूपमें आए। उनके अनौपचारिक नेतृत्वमें नासिक और धुलेके जिलोमें किसान जागृत हो गये है। अपने उत्पादनोके वाजिब दाम की माँग लेकर उन्होने रास्ता रोको और रेल रोको आदोलन करके न सिर्फ महाराष्ट्रको,बल्कि दिल्लीतकको हिला दिया।

'इस आंदोलनकी लहरें गुजरात, तमिलनाड और कर्नाटकमें भी पिछले दिनो देखी गयी है। शरद जोशीको यद्यपि प्रच्छन्न संघिस्ट ठहराया जा रहा है, और सी. आई. ए. के पैसोंसे आंदोलन चलनेकी बात कही जा रही है, लेकिन ऐसा कुछ लगता नही। पीढी–दर पीढी कर्ज की बोझसे दबे रहनेवाले किसानको शरद जोशीका सीधा गणित समझमें आ गया है। उसे चिरंतन तकलीफोसे उबरनेका एक मात्र रास्ता यही दिखाई दे रहा है कि उसके मालकी कीमत व्यापारी, दलाल या सरकार तय नहीं कर सकते। अपना माल वह मुंह मागे दामपर बेचे।

यहाँ प्रस्तुत है, महाराष्ट्रके किसान आंदोलनका आँखो देखा हाल।'

जवळजवळ पानभराच्या या लेखामध्ये नाशिक आदोलनात सक्सेनांनी पाहिलेली काही अनोखी दृश्यं, अनुभव अतिशय उत्कृष्ट हिंदीमध्ये मांडलेली होती. शरद जोशीचा शेतीविषयक आर्थिक विचारही सोप्या पद्धतीने सूत्ररूपाने मांडला होता.

शेतकरी संघटनेच्या संघटनशक्तीबद्दल सक्सेना साहेबांना विशेष कुतूहल होतं. आपल्या लेखात ते म्हणतात–

'यादो के मोटे अलबम की यह चुनी हुई चंद तसवीरें है। महाराष्ट्र के नासिक जिले में किसान आन्दोलन की जो झलकियाँ देखी, उसने मुझे अचरज में डाल दिया। इतना बडा आदोलन, जिसमें लगभग आठ हजार किसान, स्त्री–पुरुष और बच्चे गिरफ्तार हुए और अनुमानतः करीब पाच हजार पुलिस की गोलियों और लाठियों से जख्मी हुए और दो मारे गए, उस आन्दोलन के समर्थन में कही एक पोस्टर नहीं। कहीं एक हैंडबिल (पर्चा) नही। कही दीवारो पर नारों की स्याही नही। कही माइक और लाउडस्पीकर का प्रयोग नही। कैसे किसान को बटोरा जाता है? आदेश उन तक कैसे पहुँचते हैं? खर्च नो व्यवस्था कैसे होती है? सम्प्रेषण की रेखाएँ कहाँ हैं? संगठन की दीवारे कहाँ है? जिज्ञासा तेज हुई इस अभिनव आदोलन का संचालन करने वाली शेतकरी संघटना और उसके द्रष्टा शरद जोशी के बारे से अधिक जानने की। शरद जोशी जेल में थे। उनके बाद कौन है? इस प्रश्न का कोई उत्तर न था।

कार्यकर्ताओं से खोद–खोदकर सवाल पूछें। एक धुधली–सी तसवीर उभरी।

सरकारी डाक–तार विभाग के सौजन्य के बिना शेतकरी संघटना में सम्प्रेषण और संचार की समस्या पैदा नही होती। इसलिए संस्था का कागजी काम नाममात्र का ही होता होगा। शेतकरी संघटना की सारी संरचना ऐच्छिकता और स्वविवेक पर आधारित है, इसलिए आदेशों का पालन आननफानन होता है। कभी कार्यकर्ता जानबूझकर ऊपरी आदेश की उपेक्षा भी कर जाते हैं। शरद जोशीने १३ नवम्बर को अपना "रेल रोको – रस्ता रोको" आदोलन ३६ घंटे के लिए स्थगित किया था, तब उन्होने कहा था कि 'रेल रोको' हमेशा के लिए बंद किया जाता है, पर शेतकरी संघटना के किसान आदोलनकारी फिर भी कही–कही रेलें रोकते रहे।

शरद जोशी संगठन के इस ढाचे को जरूरत के मुताबिक बदल भी सकते है, क्योकि मेरे ख्याल से उन्होने ऐसी कोई कसम नही खाई है कि जो ढाचा १९८० में है, वह १९८१ या १९८५ में भी वैसा ही बना रहेगा।

मैने पाया कि कुछ लोगो को यह चिंता खाए जा रही है कि शरद जोशीने किसानों को राजनीतिक दलो से दूर रहने की सलाह देकर स्थापित राजनैतिक दलो और उनसे जुड़े हितों को जो चुनैती दी है, वह कही उन्हें महंगी न पड़े। वोटों का सबसे बड़ा बैंक तो

**'अपनी लडाई खुद लड़ रहे महाराष्ट्रके किसान'–नई दुनिया–७ दिसंबर १९८०**

गाव हैं, जहां देश की ८० प्रतिशत आबादी निवास करती है। अगर यह बैंक राजनीतिक पार्टियों से कट गए तो शरद जोशी "किंग" भले ही न हो, "किंग मेकर" तो हो ही जाएंगे। शायद राजनीतिक दलो द्वारा निगल लिए जाने या बुहारकर सार्वजनिक जीवन से बाहर फेंक दिए जाने की स्वयं शरद जोशी को सबसे कम चिंता है। अपने लिए न वे 'किंग' की भूमिका देखते है और न 'किंग मेकर' की।

अपने एक स्मरणीय वाक्य में उन्होने कहा, "देश की वर्तमान स्थिति की समस्या इतनी बुनियादी है कि उसका विश्लेषण करने के लिए एक नया मार्क्स पैदा होना पडेगा, किसानो का नेतृत्व करने के लिए फिर से महात्मा गाधी को हमारे बीच आना पडेगा और नए सिरे से स्वराज की स्थापना के लिए शिवाजी महाराज को जन्म लेना होगा। तब तक हमारा और आपका काम यही है कि हम ऐसी जमीन तैयार करें, जिसमें भविष्य में पैदा होने वाले युगपुरुष का मार्ग थोडा कम कठिन बन सके।"

यह शेतकरी संघटना के शिल्पी की फिलासफी है। वे शेतकरी संघटना के माध्यम से एक विराट ग्राम्य क्रांति के लिए जमीन तैयार करने का प्रयास कर रहे है। ऐसे बुनियादी और व्यापक कार्यक्रम का कोई टाइम टेबल नही हो सकता। पहली मंजिल से आखिरी मंजिल तक के नीले नक्शे भी पहले से तैयार नही किए जा सकते। जब ऊट किस करवट बैठेगा, तब वैसे उपाय अपनाए जाएंगे। शेतकरी संघटना एक ऐसा संगठन है, जो अभी शक्ल दे रहा है। अन्तिम कुछ नहीं है।

सवाल पूछा जा सकता है कि शरद जोशी का यह अठारह दिवसीय आंदोलन किस हद तक सफल हुआ? आंदोलन जब केवल पाँच दिन पुराना था, तब शरद जोशी ने कहा था हम तीन उपलब्धियां हासिल कर चुके है: पहली यह कि कृषि उपज के मूल्य के बारे में किसानो में व्यापक जागृति पैदा हुई है। दूसरी यह कि महाराष्ट्र का 'शकर साम्राज्य' हिल उठा है और तीसरा यह कि जातिवाद से घुटती आई राजनीति में दरार पडी है। मराठा किसान ने वंशावली की चिंता न कर शेतकरी संघटना को अपनाया है।

महत्त्वपूर्ण प्रश्न यह नही है कि शेतकरी संघटना उसके मूल्य ३०० रुपए प्रति टन और कांदे के लिए १०० रुपए प्रति क्विंटल जीत सकी है या नही। महत्त्वपूर्ण मुद्दा यह है कि किसान को अपनी शक्ति का अहसास हुआ है या नही। १९८० से शुरू होने वाला दशक किसानो की जागृति का दशक हो सकता है, जैसा कि तमिलनाडू, कर्नाटक, बिहार और गुजरात के साथ महाराष्ट्र में चले किसान आंदोलनो से जाहिर है। इस दशक मे शरद जोशी और शेतकरी संघटना पर सबकी नजरे रहेंगी।

दरअसल महत्त्वपूर्ण मुद्दा या कसौटी यह नही है कि शेतकरी संघटना किसानों को उस और कांदे के घोषित मूल्य दिलवाने में सफल हुई है या नहीं। महत्त्वपूर्ण मुद्दा यह है कि क्या वह राजनीतिक संस्थाओं से दूर रहकर भी किसानों को जगाने, उठाने और उनकी शक्ति का अहसास कराने में सफल हुई है या नही? यह बिना हिचक कहा जा सकता है कि शेतकरी संघटना ने उत्तरी महाराष्ट्र के किसान में नया जीवन फूंका है। उसका आत्मविश्वास जागा है। उसकी शक्ति ने शहरी हितों को चौंकाया है।

महाराष्ट्र के विभिन्न राजनीतिक दल अगर एक-एक कर इस विराट आंदोलन में कूदे है और बेताबी से अपनी पार्टी के हित में इस शक्ति का उपयोग करने को उत्सुक है तो उसका कारण यह विश्वास है कि शेतकरी संघटना की पूछ पकडकर वे वैतरणी पार कर जाएंगे। शेतकरी संघटना की सफलता उसका सबसे बडा खतरा सिद्ध हो सकता है।

भविष्य में क्या होता है, यह कहना कठिन है, किन्तु इतना निर्विवाद है कि शरद जोशी और उनकी शेतकरी संघटना ने किसानो में जो जागृति पैदा की है, वह सह्याद्रि तक सीमित नहीं रही है। उसकी गूज अरावली और विंध्य पर्वतमालाओ तक पहुंची है, सतपुडा और नीलगिरि में पहुंची है। हिमालय और हिंद महासागर के बीच स्थित सारे भूखंड मे किसान शक्ति के जागरण के चिन्ह नजर आने लगे है। इसका बडा श्रेय शेतकरी संघटना को है। जिनका अब भी विश्वास है कि भारत की नई क्रांति शहरों मे उगेगी, उन्हे किसानों की शक्ति का उदय चौका सकता है। १९८१ का प्रारंभ होने वाला दशक किसान शक्ति का दशक सिद्ध हो सकता है। शेतकरी संघटना का भारतीय इतिहास के नए अध्याय में क्या स्थान होगा, सारा देश यह बडी उत्सुकता से देख रहा है।'

सक्सेनासाहेबांना शेतकरी आंदोलनाबद्दल सहानुभूती निश्चित असल्याचं यालेखावरून जाणवत होतं; पण त्यामध्ये एका पत्रकाराची तटस्थताही होती. काही प्रश्न त्यांनी लेखात चांगल्या तऱ्हेने उभे केले होते, काहींची उत्तरं स्वतःच दिलीही होती.

हॉटेलात चहा प्यायला गेलो असताना सहज समोर आलेला हा लेख पाहून आम्हा सगळ्यानाच एक सुखद धक्का बसला. लेफ्टनंट वाघानी लगेच हॉटेलातल्याच एका पोराला गाठून 'नई दुनिया'च्या पाच प्रती मागवून घेतल्या. शेतकरी आंदोलनावर देशात कुठंही काहीही लिहून आल्याचं वाघसाहेबांच्या नजरेस पडलं की ते त्याचा ताबाच घेतात. या विषयावर त्यांच्याजवळ जमलेला लेख आणि कात्रणांचा संग्रह पाहण्यासारखा आहे. एवढं कशाला, सभांच्या ठिकाणी वाटली जाणारी पत्रकंसुद्धा त्यानी शर्टाच्या आतल्या बंडीमध्ये शंभराच्या नोटेसारखी जपून ठेवली होती!

¤

वरूडच्या सभेचा थाट पाहण्यासारखा होता. वरूड हे संत्र्याच्या व्यापाऱ्याचे गाव. त्यामुळे पैशाला कमतरताच नाही! सभेच्या ठिकाणी उत्कृष्ट मंडप, विद्युतरोषणाई, बसायला बैठक. बाहेरून पाहणाऱ्या एखाद्याला वाटावं कुणा श्रीमंताच्या पोराची वाजंत्रीच वाजते आहे!

आजपर्यंत अनेक राजकीय–बिगरराजकीय नेत्यांच्या पुणे-मुंबई-दिल्लीसारख्या ठिकाणच्या सभा पाहिल्या; पण इथला थाट नव्हता! शेतकऱ्यांची सभा अशा तऱ्हेनं होताना पाहून फार बरं वाटलं!

वरूडची सभा संपली आणि त्याबरोबरच विदर्भाचा दौराही संपला. आता अमरावतीला जाऊन महाराष्ट्र एक्सप्रेस पकडायची होती.

सकाळी जाग आली तेव्हा नादगाव आलं होतं. खाली उतरून चहा घेतला, लेफ्टनंट वाघानी तीन-चार वृत्तपत्रं काखेत मारून आणली काल नागपूरला झालेल्या प्रेसकॉन्फरन्सची वृत्तं भराभर साहेबासमोर टाकली.

गाडी सुरू झाली आणि आम्ही गप्पा मारायला लागलो. शरद जोशींच्या नेतृत्वाचा कस ठरवण्याची धडपड अनेक बुद्धिवंत अभ्यासिकेतल्या रेलिंग चेअरमध्ये बसून सध्या करत आहेत. त्यांचं आंदोलन-तंत्र बऱ्याच अंशी मार्क्स, माओ आणि गांधी यांच्या आंदोलनतंत्रांच्या मिश्रणातून तयार झालं आहे, असं जोशींचे पाठिराखे म्हणतात, तर He is not risen above a trade unionist असं त्यांच्या टीकाकाराचं मत आहे याच संदर्भात जोशींना विचारलं असता ते म्हणाले, 'एक महत्त्वाचा भाग म्हणजे आमचं आंदोलन आम्ही स्वतःच्या अनुभवावरून काढलेल्या निष्कर्षावर उभं केलं आहे. त्यामध्ये कोणतीही पोथीनिष्ठता नाही. क्रांतीनंतर मजुरांचं शोषण कसं होत गेलं यावर मार्क्सवाद उभा राहिला आणि आज तीच पोथी आमचे १९८१ सालातलेही ट्रेड युनियनिस्टवाले चालवत आहेत. आमचं तत्त्वज्ञान पूर्णपणे निराळ्या पायावर आहे. आम्ही असं म्हणतो की, शेतकऱ्यांचं शोषण करून भांडवलसंचय करणं योग्य होणार नाही.

'आता तंत्राच्या दृष्टीने म्हणाल तर ट्रेड युनियनिस्टमध्ये आणि आमच्यामध्ये फारसा फरक नसेलही; पण त्यांच्यासारखं आम्ही, 'आम्हाला हे द्याच' अशी मागणी सतत करत बसणार नाही. आम्ही एवढंच म्हणू की, शासनानं या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी तर्कशुद्धपणे हात घालावा, नाही तर आमचं आम्ही बघून घेऊ!'

भू-दान यज्ञाची कल्पना अंमलात आणून प्रथम विनोबांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधलं. मग त्याचा हा प्रयोग का फसला असावा, असं विचारलं असता जोशी म्हणाले, 'विनोबाजींना जमीनदारांनी पडीक, तोट्यात चालणारी अशीच जमीन दिली. त्यामुळं अशी शेती भूमिहीनांना देणं हेच अशास्त्रीय होतं. 'भारता'च्या दारिद्र्याचा प्रश्न 'भारता'नंच सोडवावा, आणि त्यामध्ये फक्त ग्रामीण भागातीलच संपत्तीचं वाटप करावं, अशी चुकीची दृष्टी या तत्त्वज्ञानामागं होती. म्हणून भू-दानयज्ञ म्हणजे गरीब शेतकऱ्यांना जास्त गरीब करणारी कृती ठरली!'

काही व्यक्तिगत आवडी-निवडीच्या गोष्टींबद्दल बोलताना जोशी म्हणाले, 'मला हिंदी चित्रपट फारसे आवडत नाहीत; पण घरी जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा टी. व्ही वरचा सिनेमा मी माझ्या कुटुंबियांसमवेत पाहात बसतो. कारण अशा गप्पा मारत, टिंगल करत वेळ चांगला जातो आणि मनाचा थकवा दूर झाल्यासारखा वाटतो.

'माझी आवडती हिंदी चित्रपट-गीतं कोणती म्हणाल, तर मी असं म्हणेन की एकूणच ज्याच्याशी आपल्या तारुण्याचा संबंध आहे त्या गोष्टी आपल्याला आवडतात. मी जेव्हा तरुण होतो तेव्हाच्या सिनेमातली गाणी मला अजूनही अतिशय आवडतात– म्हणजे सुमारे पंधरा-वीस वर्षांपूर्वीची अर्थात आजचीही गाणी तितकीच रोमॅंटिक आहेत. अडचण अशी झाली आहे की आमची वयं बदलली आहेत.

'अध्यात्म हा माझा एक अत्यंत आवडीचा विषय आहे. त्यातून सम्यक विचाराचं (system of thoughts) चांगलं प्रशिक्षण मिळतं आणि माझा त्यावर कटाक्ष असतो. जुजबी, उथळ विचाराला माझा नेहमीच विरोध असतो.

'आज आपली कुटुंबव्यवस्था ढासळत चालली आहे, अशी तक्रार अनेकजण वारंवार करताना आढळतात पण मला असं वाटतं की आपण अमेरिकेतली अर्थव्यवस्था घेतली तर तिथली कुटुंबव्यवस्थाही आपल्याला घ्यावीच लागेल कारण समाजाचा कोणताही घटक अर्थव्यवस्थेवर अवलंबून असतो. आपण जर आपल्या देशाला अनुरूप व्यवस्था घेतली असती तर हे चित्र निराळं दिसलं असतं. पण आता हळू हळू अमेरिकन कुटुंबव्यवस्थेचाही आपल्या समाजात शिरकाव होणं मला अपरिहार्य वाटतं.

'आपल्या विवाहपद्धतीमागील शुचितेची कल्पनाही नेहमीच तर्कविरुद्ध राहिलेली आहे आणि तिचाही संबंध अर्थव्यवस्थेशी असतो, असं मला वाटतं. कारण जेव्हा मालमत्ता वारसा-हक्काने जाऊ लागली तेव्हा वारसाच्या खात्रीशीरपणासाठी शुचितेला महत्त्व दिलं जाऊ लागलं; पण ही नैतिकताही फार छोट्या वर्गापुरती मर्यादित असते आणि यापुढील काळात या मर्यादाही ढिल्या पडत जातील!'

शरद जोशींच्या राजकीय विचारप्रणालीविषयीही अनेक शंका-कुशंका व्यक्त केल्या जातात. इंदिरा कॉंग्रेसवाल्यापासून तर मार्क्सवाद्यापर्यंत वाटेल ती लेबलं त्यांना चिकटवली जातात. व्यवस्था कोसळून पडण्यासंबंधी जोशींनी बोललेली काही वाक्यं विनासदर्भ वापरून त्यांना चुकीच्या अर्थानं क्रांतिकारकही ठरवलं जातं. याबाबत विचारलं तेव्हा जोशी एकदम म्हणाले, 'माझा राजकीय पक्षपद्धतीवर संपूर्ण विश्वास आहे. एवढंच नव्हे तर ज्या देशात सर्व महत्त्वाचे प्रश्न सुटलेले आहेत अशा देशातसुद्धा स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आणि जनतेला पर्याय उपलब्ध असावेत म्हणून राजकीय पक्षांची गरज आहे, असं माझं मत आहे!

'पण दुर्दैवानं, कोणतंही तत्त्व, विचार किंवा आर्थिक धोरण नसलं तरी ज्याला निवडणुका जिंकता येतात तो राजकीय पक्ष, अशी आपल्याकडची समजूत आहे.

'मी स्वतः उदारमतवादी लोकशाहीवादी आहे. जगामध्ये माणसं चांगली असतात यावर माझा विश्वास नाही; पण त्यांच्याविरुद्ध बंदुका चालवणंही मी मान्य करणार नाही. त्याचप्रमाणे विरोधी दृष्टिकोन तुडवून टाकण्याच्या व्यवस्थेलाही मी विरोधच करेन! विरोधी मत मांडलं गेलंच पाहिजे! केवळ विरोधासाठी विरोध करण्याचीही संधी दिली गेली पाहिजे, असं माझं मत आहे. कारण सत्यासत्यतेची कसोटी त्यातूनच लागत असते.

'तुम्ही म्हणता तशी मला कुठलं तरी लेबल लावण्याची घाई या विचारवंतांना का झाली आहे ते मला समजत नाही. याचं एक कारण असं असू शकेल की स्वतः लेबल लावून विचार करण्याची त्यांची प्रवृत्ती असल्याने त्यांचा संवादही त्याच पातळीवर होऊ शकतो; पण हे जर होत नाही, असं त्यांच्या लक्षात आलं तर त्यांच्याच मनाचा कोंडमारा होतो. त्यामुळे मला अशा तऱ्हेने कुठलं तरी लेबल लावून टाकणं ही त्यांच्या मनाची गरज आहे.'

महिना पंचेचाळीस हजार रुपये पगाराची स्वित्झर्लंडमधली

## 'माझा राजकीय पक्षपद्धतीवर पूर्ण विश्वास आहे' –शरद जोशी

ऐषारामी नोकरी सोडून शरद जोशी भारतात परत आले आणि अशा तऱ्हेने उन्हा-तान्हात चळवळ बाधत हिंडू लागले याबद्दल अनेकानी नापसंती दर्शवली, अनेकानी शंका व्यक्त केल्या, अनेकाना फार आश्चर्यही वाटलं; पण त्यावरचंही जोशीचं उत्तर साधं सरळ आहे–

'माझ्या वयाच्या १६–१७ व्या वर्षीच मी असा विचार करायला लागलो की आपल्या आयुष्याचं ध्येय काय असावं ? बराच विचार केल्यानंतर मी असं ठरवलं की एकच एक ध्येय निश्चित करणं योग्य होणार नाही. कोणत्या तरी एकाच दिशेनं जाण्यात अर्थही नाही. आपण आयुष्यात एकच करायचं–आपलं अनुभवाचं क्षेत्र जास्तीत जास्त व्यापक आणि समृद्ध बनवायचं. कारण यालाच मी आयुष्य जास्तीत जास्त प्रमाणात उपभोगणं असं समजतो. एकदा अशा तऱ्हेनं विचार पक्का झाल्यावर कोणतीही गोष्ट सोडायला आणि कोणतीही नवीन सुरू करायला फारसा वेळ आणि श्रम लागत नाहीत.'

¤

गप्पा संपेपर्यंत मनमाड आलं. आम्हाला इथेच उतरायचं होतं. तिथून शरद जोशीचा कोपरगाव, नगर, श्रीरामपूर असा महाराष्ट्रातल्या साखर–सम्राटाच्या साम्राज्यात दौरा सुरू होणार होता.

जोशीची ही पहिलीच वऱ्हाची वारी. त्यादृष्टीने मला आणि त्यांनाही या दौऱ्याबद्दल कुतूहल होतं, थोडी साशंकताही होती. पण जोशीच्या अपेक्षेपेक्षाही तिथे जास्त प्रतिसाद मिळाला. पुन्हा लवकर विदर्भात येऊन कापूस–उत्पादकाचा प्रश्न तीव्रपणाने लढण्यासाठी नेतृत्व करण्याची निमंत्रणंही मिळाली. अशी निमंत्रणं देणाऱ्यांमध्ये सर्वांत जास्त पुढाकार तरुण शेतकऱ्यांचा होता, हे विशेष.

जोशीच्या व्यक्तिमत्वाविषयीही अनेक शंका, संशय–बहुतेक वेळा त्यांना न भेटताच–व्यक्त करण्याचे प्रकारही बरेच घडले. त्याची भविष्यातील वाटचाल कशी राहील, याविषयीही अनेकानी आपले अदाज वर्तवले आहेत. हा मनुष्य सत्ता किंवा पैशाच्या जाळ्यात अडकणारा नाही, हे गेल्या दीड–दोन वर्षांत त्यानी सिद्ध केलेलं आहे. यापुढेही त्याना तो धोका उद्भवेल असं वाटत नाही. कारण हे सर्व त्यानी उपभोगलं आहे. त्या दृष्टीने यवतमाळच्या सभेत जोशीनी सांगितलेली वाक्यं महत्त्वाची आहेत. ते म्हणाले होते- 'लोक मला विचारतात, तुम्हाला नेमकं हवंय तरी काय ? मी सागतो, आमदारपद, खासदारपद किंवा मंत्रीपद या तर क्षुद्र कीटकांच्या महत्त्वाकाक्षा ! मला एकच सुख हवय- मला या देशातल्या अर्धपोटी शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर थोडं हसू फुललेलं पाहायचंय आणि या मार्गात मी त्याना एक इंचभर जरी पुढे नेऊ शकलो तरी स्वतःला कृतार्थ समजेन !'

ही भावना किंवा हा दृष्टिकोन ज्यांच्या बुद्धीला पटणंच शक्य नाही त्यांना शरद जोशी हे गौडबंगाल वाटणं स्वाभाविकच आहे; पण इतरानी तरी यावर विश्वास ठेवायला काय हरकत आहे ?

असं गृहीत धरून चालू की यापुढील काळात शरद जोशी आपल्या लढ्यात पूर्णपणे अपयशी ठरतील इथल्या सधिसाधू राजकीय पक्षाच्या गदारोळात त्यांचा 'अभिमन्यू' केला जाईल. पण त्या वेळीही असा एक अभिमन्यू आमच्यामध्ये १९८० च्या दशकात निर्माण झाला होता हीही काही कमी अभिमानाची गोष्ट असणार नाही !

□

---

## इंदिरा राजवट

पृष्ठ ३ वरून

लीच नाही व ज्या पद्धतीने त्याचे कार्य चालू आहे ते लक्षात घेता तशी निकड कोणालाच दिसत नाही. दिल्लीत अखिल भारतीय इदिरा काँग्रेस समितीची बैठक झाली; पण त्यात संघटनात्मक प्रश्नावर चर्चाच झाली नाही. मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ पुनर्रचनेबाबत केंद्रीय ससदीय मंडळाचा सल्ला न घेताच निर्णय घेतात. इदिरा गाधीची भेट घेऊन त्याची पसंती मात्र ते घेतात. कारण त्याची एकदा संमती घेतल्यावर मग संसदीय मंडळ काही आक्षेप घेऊ शकत नाही हे त्याना माहीत झालेले आहे.

प्रजासत्ताकाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न म्हणजे प्रजेची सत्ता–म्हणजे लोकसत्ता खरोखर वाढत आहे का ? त्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे लोक सतत जागरूक हवेत. देशात अध्यक्षीय लोकशाही आणण्याचा सरकारचा विचार नाही, असे इंदिरा गाधी म्हणत आहेत मग या प्रश्नावर देशभर चर्चा झाली पाहिजे असे त्या का म्हणतात ? आणि इंदिरा काँग्रेसचे काही नेते अध्यक्षीय पद्धतीचा पुरस्कार का करतात ? योग्य वेळ पाहून हा बदल केला जाईल ही विरोधी नेत्याना वाटणारी भीती अगदीच निराधार म्हणता येणार नाही. अध्यक्षीय लोकशाहीचा काही देशातला प्रयोग पाहता त्यातून एका व्यक्तीची हुकूमशाही प्रस्थापित झाल्याचे दिसून येते. तेव्हा अध्यक्षीय पद्धती येऊ द्यावयाची नाही हे विरोधी नेत्यांनी ठरविले पाहिजे आणि जनतेला त्यातील धोके समजावून सांगितले पाहिजेत. संसदीय लोकशाही आपल्याकडे ज्या पद्धतीने राबविली जात आहे त्यात अनेक दोष व उणीवा आहेत. त्या दूर करायला हव्यात. पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे निश्चित राजकीय धोरण व कार्यक्रमावर अधिष्ठित अशा शिस्तबद्ध राजकीय पक्षाची बांधणी हवी. प्रभावी विरोधी पक्ष स्थापन होईपर्यंत विरोधी पक्षानी समान प्रश्नावर सहकार्य करायला हवे. त्यातूनच प्रभावी पर्यायी शक्ती उभी राहील. सत्तेच्या मागे न लागता विधायक कार्य आणि शाततापूर्ण संघर्षावर भर द्यावयास हवा. लोकसमित्याही संघटित करायला हव्यात. लोकशाहीवाद्यांपुढे नव्या वर्षात ही आव्हाने आहेत.

□

# इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशन

## सुवर्णमहोत्सवी अधिवेशन : मुंबई, २७-२८ डिसेंबर १९८०

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

'भारतीय बुद्धिप्रामाण्यवादी संघटना' या नावाची कुणी संस्था अस्तित्वात आहे, ही गोष्ट बऱ्याच लोकांना ठाऊक नसेल. फार काय या संस्थेचे सुवर्णमहोत्सवी अधिवेशन नुकतेच मुबईला पार पडले त्याचीही दखल वृत्तपत्रांनी घेतली नाही. 'पोपईत गणपतीचा आकार' वगैरे बातम्या फोटोसह देणाऱ्या आपल्या वृत्तपत्राचेकडून अशी अपेक्षा करणेही चुकीचे आहे. असो.

हे अधिवेशन मुंबईला झाले याचे कारण ५० वर्षांपूर्वी या संस्थेची स्थापना मुंबईमध्येच झाली. रँ. र. पु. परांजपे, डॉ. देशमुख, डॉ. कर्वे, जाल कूपर, बी. जी. हॉर्निमन वगैरे जबरदस्त मंडळी संस्थापकांमध्ये होती. त्यानंतरही अनेक नामवंत न्यायमूर्ती, वकील, डॉक्टर इ. या संस्थेचे सभासद होते. जनसामान्यांपर्यंत मात्र या संस्थेचे काम पोचू शकले नाही, याचं कारण या संस्थेचा कारभार सर्व इंग्रजीतून चाले; फक्त मोठया शहरात याच्या शाखा असत आणि तेथेही व्याख्याने, चर्चा, निरुपद्रवी ठराव, एखादे मासिक रडतखडत चालवणे एथपर्यंतच यांच्या कार्याची मर्यादा असे. डॉ कोवूर यांनी धडाधड आव्हाने देऊन, बुवालोकाच्या बदमाशगिऱ्या चव्हाटयावर आणून, स्वतः जाऊन अनेक अतीद्रिय समजल्या जाणाऱ्या प्रकाराचा छडा लावून थोडयाच वर्षात बुवाबाजी हटवण्याचे जे काम केले ते या संस्थेला पन्नास वर्षांतही करता आले नाही. त्या दृष्टीने काही ठाम पावले उचलण्याचा विचार या अधिवेशनात व्हायचा होता.

दादरच्या बाल मोहन विद्यामंदिरात अधिवेशनाचे उद्घाटन झाले. स्वागतसमितीचे अध्यक्ष होते मुबई हायकोर्टाचे जस्टिस् जहागिरदार. बुद्धिप्रामाण्यवादी चळवळीत असणारे मुंबईचे महत्त्वाचे स्थान त्यांनी सागितले, पण त्याबरोबरच आजकाल वाढत चाललेल्या दैववादी प्रवृत्तीही मुबईत जोरदारपणे वाढत असल्याचे त्यांनी मान्य केले. आपल्याला काही लाभ व्हावा या हेतूने होणारी देवदर्शने, पूजा आणि तीर्थयात्रा आणि महापालिकेला शह देण्याकरता किंवा आपली दादागिरी सिद्ध करण्याकरता एका रात्रीत फूटपाथवर उभी रहाणारी देवळे यांचा त्यांनी उल्लेख केला. ते म्हणाले, 'मुंबईतबहुढंगी आणि बहुरंगी वस्ती असली तरी त्याचा फक्त इथे सहवास असतो सहकार्य नसते. पारशी जिमखाना, हिंदू जिमखाना, मुस्लिम जिमखाना असे प्रकार खेळासारख्या स्नेहभाव वाढवणाऱ्या गोष्टीतही चालत असत. मुंबईतच एक केवळ हिंदूंचेकरता पोहोण्याचा तलाव होता. त्याचा उल्लेख करून बॅ. जीना एका व्याख्यानात म्हणाले होते– 'या टीचभर तलावात तुम्ही आमच्याबरोबर तरंगायला तयार नाही, आणि आम्हाला सागताहेत राष्ट्रीय जीवनप्रवाहात सामील व्हा!' ब्रिटिश राजवटीमध्ये आर्यसमाजासारखे पुरातन परंपरा कायम राखू पाहणारे लोक, थोडी परंपत थोडी–सुधारणा हवी असणारे नियममार्गी, आणि थॉमस लेन, जॉन स्टुअर्ट मिल, स्पेन्सर यांच्या विचाराचा परिणाम झालेली नास्तिक व अज्ञेयवादी मंडळी असे बौद्धिक वर्गीकरण झाले होते. महाराष्ट्रामध्ये बुद्धिप्रामाण्यवाद्यांची मोठी परंपरा होऊन गेली. त्यात लोकहितवादी देशमुख, महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर आणि गोपाळ कृष्ण गोखले यांचा विशेष उल्लेख करावा लागेल!' शेवटी त्यांनी राजधानीत झालेल्या सतीदेवीच्या मंदिराला पाठिंबा देणाऱ्या मोर्चाचा उल्लेख केला आणि आजही जुन्या परंपरा जपणाऱ्या लोकाचा केवढा प्रभाव समाजात आहे याचे हे निदर्शक आहे असे सांगितले. हिंदू धर्माचा कट्टर शत्रू समजल्या जाणाऱ्या औरंगजेबाने सतीबंदीचा कायदा केला होता ही फारशी कोणाला माहीत नसणारी गोष्टही त्यानी सांगितली.

त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चिन्नाप्पा रेड्डी यांचे उद्घाटनाचे भाषण झाले. त्यांनी अतिशय मुद्देसूद आणि ओघवत्या भाषेत, बुद्धिप्रामाण्यवादाचा अभाव हा अन्यायजनक सामाजिक व्यवस्था कायम राखण्यास कसा कारणीभूत होतो हे समजावून सागितले. ते म्हणाले, 'त्यामुळेच अशी व्यवस्था बदलणे ज्याना त्रासदायक ठरेल असे समाजातील प्रबळ गट पुराण्या परंपरांची महती गात त्या कायम राखण्याचा जबरदस्त प्रयत्न करत असतात. शिक्षणसंस्था, वृत्तपत्रे, प्रकाशनसस्था, मोठे उद्योग, फार काय सरकारी प्रसारमाध्यमे या ठिकाणी याच प्रवृत्तीच्या लोकांचे वर्चस्व असल्यामुळे बुद्धिवादी विचाराच्या निर्मितीला आणि वाढीला मोकळीक मिळणे अतिशय अवघड असते. भारतीयाच्या हाडीमासी खिळलेला 'कर्मसिद्धात' हा सुद्धा, 'आपण आपल्या कर्मामुळेच या पददलित अवस्थेत आहोत, दैवात असेल तर पुढे जाऊ शकू' अशी पराभववादी, निष्क्रियतेलाच उत्तेजन देणारी, षंढमनोवृत्ती कोटयवधी भारतीयांचेमध्ये निर्माण करायला कारणीभूत झालेला आहे आणि त्यामुळेच कर्तृत्व, धडाडी, परिश्रम, दीर्घोद्योग, सतत अभ्यास या गुणांऐवजी, एखाद्या बाबाचा आशीर्वाद, ग्रहाची शुभदृष्टी, शकुनाची अगठी, सोळा सोमवारचे व्रत असल्या अशास्त्रीय, भाबडया समजुती आमच्या समाजात बळावत आहेत. लहानपणापासून स्वतंत्र आणि शास्त्रीय दृष्टीने विचार करण्याचे शिक्षण देणे आणि समाजविघातक अंधश्रद्धांच्या निर्मूलनाचे जाणीवपूर्वक प्रयत्न करणे हाच ही परिस्थिती बदलण्याचा मार्ग आहे!'

यानंतर डॉ.पी.एम्. भार्गव यांचे अध्यक्षीय भाषण झाले.डॉ. भार्गव

हे नामवंत शास्त्रज्ञ असून पेशीजीवशास्त्र हा त्यांचा विषय आहे. 'सायन्स टुडे' मासिकातील त्यांची 'शास्त्रीय पद्धती' Scientific Methods ही माला लोकप्रिय झाली आहे. त्यांनी अनेक जुन्या समजुती शास्त्रीय संशोधनानंतर कशा फोल ठरतात त्याचे उदाहरणे देऊन स्पष्टीकरण केले. ते म्हणाले, 'एखाद्या मृत झालेल्या व्यक्तीवर तात्काळ योग्य ते उपचार केल्यास ती पुन्हा जिवंत होऊ शकते ही एकच गोष्ट आत्म्याचे अस्तित्व नाशाबित करण्यास पुरेशी आहे' असे सागून त्यांनी श्रद्धाजन्य सिद्धान्त आणि शास्त्र (Dogma & Science) यातला फरक स्पष्ट केला. 'हे कसे?' असा प्रश्न न करता मान्य केली जाते ती श्रद्धा तर 'हे कसे?' असा प्रश्न करून निर्माण होते ते शास्त्र. असे प्रश्न उत्पन्न करण्याची आणि त्याना योग्य उत्तरे शोधून काढण्याची क्षमता म्हणजेच बुद्धिमत्ता.

धर्म आणि शास्त्र यांचा उगम एकच आहे. तो म्हणजे सत्य काय आहे ते शोधून काढण्याची जिज्ञासा. साक्षात्काराने समजलेले सत्य म्हणजे श्रद्धाजन्य सिद्धांत होत तर शास्त्रीय पद्धतीने शोधून काढलेले सत्य म्हणजे शास्त्रीय सिद्धात होत. त्यामुळे सर्व शास्त्रीय सत्ये ही परिवर्तनीय असतात. त्याविरुद्ध प्रश्न करण्याची परवानगी असते आणि हेच शास्त्रीय गतीचे आणि प्रगतीचे कारण असते. शास्त्रामध्ये अखेरचा शब्द कधीच असू शकत नाही. अज्ञानाचे शास्त्राला भय वाटत नाही. याउलट 'मला ठाऊक नाही' असे उत्तर परमेश्वराचा दूत वा मुलगा वा अवतार देऊच शकत नाही. या अज्ञान मान्य करण्याच्या भीतीतून श्रद्धेयसिद्धात जन्म घेतात आणि अशा सिद्धातवाद्याचा शास्त्रज्ञांना नेहमीच प्रखर विरोध होतो. गॅलिलिओपासून मेरी स्टोटसपर्यंत अनेक शास्त्रवेत्त्यांना श्रद्धावाद्यांच्याकडून जबरदस्त छळ सहन करावा लागला आहे. श्रद्धासिद्धात कधी बदलत नाहीत, उलट नवनवीन गोष्टींची भर पडून शास्त्र वाढत असते. श्रद्धासिद्धात जितका पुराणा तितका जास्त अढळ समजला जातो. याउलट शास्त्रात नवीमात नवीन ते ग्राह्य समजतात. शास्त्र हे सबंध जगात सारखेच असते, श्रद्धासिद्धात मात्र जागोजागी वेगवेगळे आढळतात. शास्त्रात गुप्त काही नसते. सर्वांना तिथे मुक्तद्वार असते. श्रद्धासिद्धातात इतर श्रद्धावाद्याना मज्जाव असतो. शास्त्रीय पद्धती सर्व जगभर सारख्याच असतात. श्रद्धापद्धतीत मात्र ठिकठिकाणी फरक आढळतो. शास्त्रीय पद्धतीचा फायदा सर्व मानवजातीला मिळतो. श्रद्धासिद्धात त्या गटापुरते मर्यादित असतात. श्रद्धासिद्धात मानवात फूट पाडतात. शास्त्र मानवाची एकजूट घडवते.'

यानतर संघटनेचे मुख्य सचिव श्री. सूर्यनारायणन याचे आभारप्रदर्शनाचे भाषण झाले आणि पहिल्या दिवशीचा कार्यक्रम संपला.

◘

दुसऱ्या दिवशी अनेक ठराव संमत करण्यात आले. त्यात मुख्य ठराव होता, काही धर्मांमध्ये धर्मगुरूंकडून केल्या जाणाऱ्या निष्पाप नागरिकांचे छळाविरुद्ध. धार्मिकबाबतीत या गुरूंचे बंधन जर त्या जमातीच्या नागरिकाने मान्य केले असेल तर त्याविरुद्ध कोणालाच बोलता येणार नाही; पण लग्न करणे, व्यवसाय सुरू करणे यासारख्या सामाजिक आणि आर्थिक बाबतीतही या धर्मगुरूंची परवानगी बराच नजराणा देऊन घ्यावी लागते. त्या वेळी त्याविरुद्ध सुजाण नागरिकानी आवाज उठवणे योग्यच असते. हा ठराव अर्थातच वोहरा जमातीच्या धर्मगुरूंच्या विरुद्ध होता. या वेळी नाथवाणी कमिशनच्या अहवालातील अनेक भयप्रद प्रकार काही सभासदानी सांगितले. Indian Rationalist Association चे अध्यक्ष याह्या लोखंडवाला हे स्वतःच बोहरी आहेत. त्यांच्या 'धर्मविरोधी' वर्तनामुळे त्यांच्यावर बहिष्कार घालण्याची धमकी त्यांना मिळाली होती; पण ती प्रत्यक्षात येण्यापूर्वी त्यांनीच आपला 'धर्म' सोडून दिला. आता ते फक्त एक भारतीय सद्‌गृहस्थ आहेत.

जस्टिस जहागिरदार यानी या वेळी एक विशेष गोष्ट सांगितली. 'अशा तऱ्हेने 'धर्मविरोधी' वर्तन करणाऱ्या नागरिकाला 'शासन' करण्याचा अधिकार म्हणजे प्रचलित राज्यव्यवस्थेवर अविश्वास होय, एवढेच नव्हे तर हे एक प्रकारचे समातर सरकार होय, असा युक्तिवाद करून अशा प्रकारे 'बहिष्कार' टाकण्याची शिक्षा बेकायदेशीर ठरविण्यात यावी असा एकाने मुबई उच्च न्यायालयात अर्ज केला होता. त्याची सुनावणी होऊन न्यायालयाने ही बाजू मान्य केली; पण धर्मगुरुमंडळींनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि सर्वोच्च न्यायालयाने मुबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय रद्दबातल ठरवला. तसा तो रद्द झाला नसता तर सार्वभौम मत्ताधाऱ्यांच्या आविर्भावात पूर्वीच्या संस्थानिकाप्रमाणे मन मानेल तसे अधिकार बजावणाऱ्या या धर्मगुरूंना जरा आळा बसला असता.'

या अधिवेशनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये एक 'अतीद्रिय घटनांचा शोध घेणारी समिती' (Committee for the investigetion of Paranormal phenomena) नेमण्यात आली. आध्रमधल्या एका खेड्यात सत्यसाईबाबांचे भक्त असणाऱ्या एका कुटुंबातील मुलाच्या अंगातून विभूती निघत असे या 'चमत्काराचा' शोध घेऊन ही विभूती त्या मुलाच्या कपड्यातच लपवलेली असे, हे शोधून काढणारे, बंगलोर विद्यापीठाचे माजी कुलगुरू श्री. नरसिंहय्या याना या समितीचे प्रमुख नेमण्यात आले. ज्या कोणाला अशा चमत्कारांचा शोध घेण्याची इच्छा असेल त्यांनी नरसिंहय्या याच्याशी संपर्क साधावा.

अधिवेशनाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या प्रसंगी लोकांनी रक्तदान, नेत्रदान याप्रमाणे मरणोत्तर देहदान करण्याचे मान्य करून वैद्यकीय संशोधनाला मदत करावी असे आवाहन करण्यात आले होते. त्याला सर्व भारतातून सुमारे शंभर नागरिकानी प्रतिसाद देऊन आपला देह देण्यास संमती दर्शविली होती. अधिवेशनातील जे प्रतिनिधी असे दान करण्यास तयार असतील, त्यांच्याकडून या वेळी प्रतिज्ञापत्रके भरून घ्यायची होती; पण यातही कायदेशीर अडचणी बऱ्याच असल्याचे नामवंत कायदेपंडितांनी निदर्शनास आणले. मी वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असताना श्री. आपटे गुरुजी यानी आपला देह आमच्या महाविद्यालयाला दिला होता, ही हकीगत मी सांगितली. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, मरणापूर्वी तुम्ही काहीही लिहून दिले, तरी मरणोत्तर तुमच्या मृतदेहावर तुमचा हक्क नसून तुमच्या वारसाचा ताबा असतो. त्यामुळे तो अगदी कायदेशीरपणे देहदान करण्याच्या भानगडीत न पडता तुमचा अंत्यविधी करू शकतो. नेत्रदानाच्या बाबतीत हा कायदा योग्य त्या पद्धतीने बदलण्यात आला आहे. (तरीही अनेक वारस नेत्रपेढीला न कळवता अंत्यविधी पार पाडतातच!) संपूर्ण देहदान करता यावे याकरताही कायद्यात बदल करायला लागतील. त्या दृष्टीने हालचाली करण्याकरता तज्ज्ञ विधिज्ञाची एक समिती नेमण्यात आली. गुजराथ राज्याचे पहिले मुख्यमंत्री जीवराज मेहता यांनी स्वतः देहदान करण्याची तरतूद मृत्युपत्रात केली होती; पण त्यांच्या सांगण्यानुसारच देह ताब्यात घ्यायला गेलेल्या डॉक्टरमंडळीना धुडकावून लावून त्यांच्या वारसानी अंत्यसंस्कार पार पाडले. (बुद्धिप्रामाण्यवादी मंचातर्फे पुण्यातही आम्ही ही मोहीम सुरू केली आहे. दानेच्छू मंडळींनी हिंदी निकेतन, एस. पी. कॉलेजसमोर, येथे नावे नोंदवावी.)

अधिवेशनात एक गोष्ट खटकली, ती म्हणजे सर्व प्रतिनिधी तामिळनाडू, केरळ, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, आणि गुजराथ या राज्यातील होते. दिल्ली वगळता उत्तर भारतातील कोणीही नव्हते. दिल्लीचे प्रतिनिधीही मूळचे दाक्षिणात्यच होते. अनेक राज्यात अद्याप या 'भारतीय' म्हणवणाऱ्या संघटनेच्या शाखा नाहीत, त्याचा हा परिणाम. याचे कारण काय? सभागृहात एक बोधवाक्य लावले होते, ते पुरेसे बोलके आहे.

'Reason thinks, while Relegion believes, And as it is much more easy to believe than to think, we have many more believers than thinkers!'

□

मुलाखत

# स्वरांकडून ' चित्र 'कथेकडे....

## –भास्कर चंदावरकर

श्री. भास्कर चंदावरकर हे नाव मराठी माणसास (*आणि गेल्या वर्षांत पूर्ण* भारतात व परदेशातही) सुपरिचित आहे. एक उत्तम सतारवादक आणि संगीताचे प्राध्यापक ही त्याची ओळख जुनी झाली. ' घाशीराम कोतवाल ' आणि ' तीन पैशाचा तमाशा ' या (वादग्रस्त) नाटकाचे संगीत दिग्दर्शक , ' मुद्राराक्षस ' व ' शाकुंतल ' या नाटकाच्या जर्मन प्रयोगांनाही यांचेच संगीत-दिग्दर्शन लाभलेले. परदेशातील यांचे सतार-वादनाचे कार्यक्रम वगैरेमुळे या गृहस्था-भोवती पुरेसे कुतूहलाचे वलय निर्माण झालेले.

चित्रपटसंगीतकार म्हणून तर त्याचे नाव आहेच; पण ' सर्वसाक्षी ' या चित्रपटानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू लोकांसमोर आला. तो म्हणजे चित्रपटाचे ' पटकथाकार ' हा. ' सर्वसाक्षी 'च्या यशा-मागोमाग, राष्ट्रीय चित्रपटविकासमहा-मंडळाने घेतलेल्या पटकथास्पर्धेत त्याच्या ' अत्याचार ' या पटकथेस बक्षीस मिळाले आहे. ' सर्वसाक्षी ' व ' अत्याचार ' या दोन्ही पटकथा भास्कर चंदावरकर यानी त्याच्या पत्नी सौ. मीना चंदावरकर यांच्यासह लिहिल्या आहेत.

संगीताच्या क्षेत्रात झक्क चालले असताना हा गृहस्थ एकाएकी चित्रपटाच्या पटकथा लिहिण्याकडे कसा काय वळला बुवा ? हा प्रश्न (मागाशी बरा होता आता काय झालं याला ? या प्रश्नाच्या चालीवर) मला उगीचच अस्वस्थ करीत होता. तेव्हा बक्षीस मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला जावे व प्रश्नाचे निराकरण करून घ्यावे असे मी ठरवले

मी विचारलेल्या प्रश्नावर थोडासा विचार करून ते म्हणाले, " इथल्या ' फिल्म इन्स्टि-ट्यूट 'मध्ये संगीताचा प्राध्यापक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांच्या चित्रपटांना संगीत देण्याच्या *निमित्ताने आणि ती संस्थाच* चित्रपटाला वाहिलेली असल्यामुळे चित्रपट या माध्यमाशी खूपच जवळून ओळख झाली. केवळ चित्रपटच नव्हे तर त्या क्षेत्रातील अनेक बुद्धिमान थोर कलावंत, उदाहरणार्थ, ऋत्विक घटक, सत्यजित राय, कारंथ, कर्नाड हेही लोक जवळून बघायला मिळाले. त्यांच्याशी अनेक वेळा विविध विषयावर मनमोकळी चर्चा करता आली.

: आणि त्याच्याशी बोलताना मला असे आढळून आले की, या सर्व मोठ्या चित्र-दिग्दर्शकांना संगीताची उत्तम जाण आहे. ऋत्विक घटक यांनी तर चक्क अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे संगीताचे शास्त्रोक्त धडे गिरवलेले; जगविख्यात सतारवादक व श्री. चंदावरकर यांचे गुरू पं. रविशंकर यांच्याशीही त्यांची चांगलीच मैत्री.

: सत्यजित राय यांना शब्द-चित्र यांचा वारसा व सहवास घरातच लाभला. असे असूनही त्यांच्या मते चित्रपट या माध्यमाशी अत्यंत जवळचे माध्यम संगीत हेच आहे. शब्द किंवा चित्र नव्हे.

: याचे कारण चित्रपट ही सुद्धा संगीता-प्रमाणेच ' रचनात्मक कला ' आहे. संगीता-प्रमाणेच येथेही ' रचना ' (कॉंपोझिशन) महत्त्वाची असते. एखाद्या वाद्यवृंदाप्रमाणेच चित्रपटातही अनेक गोष्टींचा ' मेळ ' साधावा लागतो. (ऑर्केस्ट्रेशन ऑफ एलेमेंटस्) तरच तो चित्रपट सुंदर बनतो, त्या चित्रपटाला एक ' दृश्यलय ' मिळते.

: हे सगळे विचार मनात घोळत होते; त्यावर सतत चिंतन चालू होते. शिवाय हे सगळे लोक आमच्या घरी नेहमी येत, आमच्या या विषयावर सतत चर्चा होत असत, त्यामुळे माझी पत्नी–सौ. मीना–ही सुद्धा ' स्क्रिप्ट ' या विषयाकडे आकर्षिली गेली. फिल्म-इन्स्टिट्यूटचा चित्रपटरसग्रह-णाचा कोर्सही मी तिला करावयास सांगितले. कारण त्या निमित्ताने अनेक उत्तम चित्रपट बघायला मिळतात, विविध विचार ऐकायला मिळतात आणि त्यामुळे आमच्या विचाराना एक निश्चित दिशा मिळायला मदत होते. कै. चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या कवितांवर आधारित ' नक्षत्रांचे देणे ' हा जो कार्यक्रम आम्ही केला त्याचे संपादन व स्क्रिप्टलेखन आम्ही दोघांनीच केले होते.

: दरम्यानच्या *काळात ' सामना '* चित्र-पट प्रकाशित झाला, गाजला, बर्लिनलाही जाऊन आला आणि ' सामना 'चे निर्माते श्री रामदास फुटाणे यांनी नव्या चित्रपटाची जुळवाजुळव सुरू केली. मानवत खूनसत्रावर आधारित ग्रामीण भागातील अंधश्रद्धेवर प्रकाश टाकणारी एक कथा स्वत: रामदास फुटाणे यांनीच लिहिलेली होती. पटकथाकार विजय तेंडूलकर व दिग्द-र्शक म्हणून जब्बार पटेल यांनीच पुन्हा एकत्र यावे अशी त्यांची इच्छा होती; परंतु काही कारणांमुळे ते होऊ शकले नाही. तोपर्यंत आपण पटकथा लिहू शकतो, असा विश्वास माझ्याही मनात निर्माण झाला होता व तसे मी रामदास फुटाणे यांना बोलूनही दाखवले. त्याचा होकार मिळताच मी व मीनाने पटकथेवर मेहनत घेण्यास सुरुवात केली. काही महिन्यानी मनाजोगती, मजबूत बांधणीची पटकथा जमल्याचे आम्हाला दिसले. ती पटकथा वाचून फुटाणे यानी मलाच ' सर्वसाक्षी ' दिग्दर्शित कर-ण्याची विनंती केली; परंतु मी ती नाकारली. याचे एक कारण म्हणजे माझी नोकरी व परदेशदौरे यातून चित्रपटाकडे नीट लक्ष देणे जमणार नव्हते आणि फुटाणे याची ती आवडती, स्वत:ची कथा असल्याने त्यांनीच दिग्दर्शन करणे अधिक उचित ठरले असते.

: १९८० च्या बंगलोर येथील आंतर-राष्ट्रीय चित्रपटमहोत्सवात, इंडियन पॅनोरामा विभागात हा चित्रपट दाखवला गेला. चित्र-रसिकांनाही तो आवडला. एका अमेरिकन चित्ररसिकाने तर ' सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपट ' अशी त्याची स्तुती केली. पटकथेची खूपच प्रशंसा झाली.

: तेव्हा अशा तऱ्हेने मी, किंबहुना आम्ही, पटकथेच्या क्षेत्रात उतरलो. बोल! तुझा पुढचा

प्रश्न काय ?"

'अर्थातच ही पटकथास्पर्धा व तुमच्या बक्षीसप्राप्त 'अत्याचार' या पटकथेबद्दल..'. –मी

पूर्वीच्या 'फिल्म फायनान्स कॉर्पोरेशन' (आताचे नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) ने आयोजित केलेली ही पहिलीच अशा स्वरूपाची स्पर्धा. त्याच्या नियम, अटी वगैरे काही सागत नाही, उगीच तुला बोअर का करा? (मलाही जरा बरे वाटले.)

: या स्पर्धेत भाग घ्यायचा हे तर आम्ही ठरवले. कारण तोपर्यंत आमच्यात तेवढा विश्वास पूर्णपणे होताच. नंतर डिसेंबर १९७८ मध्ये 'ग्रंथाली' तर्फे एक परिसंवाद मुंबईत आयोजित करण्यात आला होता. त्याच वेळी श्री. दया पवार यांच्या 'बलुतं' या पुस्तकाचे प्रकाशनही होते. त्याच्या काही प्रती आम्हीच मुंबईस नेल्या. जाताना प्रवासात मीनाने ते पुस्तक पूर्ण वाचून काढले आणि 'फारच छान आहे' वगैरे शब्दात प्रशंसा केली.

: पण त्या दिवशी 'मुंबई बंद' असल्याने आम्हाला समारंभस्थळी जाणे अशक्य वाटू लागले. योगायोगाने एक स्नेही भेटले. त्यांच्या बरोबर पुस्तके पाठवून दिली आणि लगोलग आम्ही पुण्यास परतलो. परतीच्या प्रवासात ते पुस्तक मी वाचले आणि अक्षरशः भारून गेल्यासारखा झालो. यावरच पटकथा लिहायची ठरले. दया पवार यांनीही तत्परतेने परवानगी दिली. पवार यांच्याबरोबरच यशवंत मनोहर व इतर अनेकांबरोबर गप्पागोष्टी झाल्या. त्यातूनही अनेक गोष्टी, अनुभव-कथा कळल्या. त्यांच्यायोगे आमची पटकथा समृद्ध होऊ लागली.

: त्याच सुमारास (थोडेसे अगोदरच) केरळमध्ये एका चित्रमहोत्सवाचे उद्घाटन माझ्या हस्ते होते. पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटचे एक विद्यार्थी व दिल्लीच्या सध्याच्या चित्रमहोत्सवातील एक 'ज्यूरी' श्री. अरविंदन यांच्या एका चित्राला माझे संगीत होते व त्याला राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे, त्यामुळे मला हा मान मिळाला (आणि श्री. चंदावरकर सुद्धा 'सी. भास्करन्' म्हणून तेथे सहज खपून जातील. कसे?) तेथेही या स्पर्धेविषयी उत्सुकता होती व लोक कसोशीने प्रयत्न करत होते. त्यामुळे स्पर्धेत उतरण्याचा आमचा निश्चय अधिकच पक्का झाला.

आम्ही ती पटकथा सर्व अटी पूर्ण करून अगदी शेवटच्या दिवशी वगैरे गडबडीने पाठवली; पण नंतर त्याची मुदत तीन महिन्यांनी वाढवली गेली. त्या मुदतीचा, आमची पटकथा अधिक चांगली करण्याकरता उपयोग झाला असता, पण तसे काही झाले नाही.

१९८० च्या मार्चमध्ये आम्ही सहकुटुंब अमेरिकेच्या पाच महिन्याच्या मोठ्या दौऱ्यावर होतो आणि अमेरिकेत असतानाच महामंडळाकडून आमच्या पटकथेची बक्षिसासाठी निवड झाल्याची तार आली; परंतु हा निर्णय दिल्लीच्या चित्रपटमहोत्सवात जाहीर केला जाईल असे कळवले होते व त्याप्रमाणे शनिवारी दि. १० जानेवारीला हा निर्णय जाहीर झाला.

'आता त्या पटकथेवर लवकरच चित्रपट निघणार आहे. या फेब्रुवारी महिन्यापासून त्याचे चित्रीकरण सुरू होईल आणि... त्याचे दिग्दर्शन मी स्वतःच करणार आहे' हे वाक्य श्री. चंदावरकर यानी अगदी हळूच उच्चारले आणि डोळे मिचकावून मोठ्ठे स्मित केले.

त्यांच्याशी बोलताना, बोलण्याच्या ओघात त्यानी एक किस्सा सांगितला, तो येथे देणे महत्त्वाचे आहे. मुंबईच्या 'सिने व्हिजन' या सिद्धार्थ काकसंपादित नियतकालिकासाठी सत्यजित राय याची मुलाखत चंदावरकर यांनी घ्यावी असे ठरले. फोनवरून मुलाखतीची वेळ ठरवताना राय यानीच चंदावरकर यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली आणि प्रत्यक्ष भेटीत तर 'मी तुमचा चाहता आहे' ('अॅडमायरर' हा मूळ शब्द) असे सांगून चंदावरकरांची आनंददायक विकेट उडवली! चंदावरकर यांनी संगीत दिलेल्या केरळी सिनेमाबद्दल तर 'अद्वितीय चित्रसंगीत' अशा शब्दात कौतुक केले!

हा किस्सा ऐकताना मला खरोखरच बरे वाटले. ('मराठी अस्मिता?') ज्यांचे कौतुक सत्यजित रायसारख्या मोठ्या माणसाने केले त्यांचे कौतुक म्या पामराने काय बरे करावे?

— निखिल गजेंद्रगडकर


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लहानी–( लहानपणच्या आठवणी )–दुर्गाबाई भागवत | रु. | १५/– |
| २. | नरभक्षकाचे आव्हान–( शिकारकथा )–केनेथ अँडरसन | ,, | २५/– |
| ३. | असं असतं जगल–( शिकारकथा )–केनेथ अँडरसन | ,, | २५/– |
| ४. | शिवनपल्लीचा काळा चित्ता–( शिकारकथा )–अँडरसन | ,, | २०/– |
| ५. | माहिष्मती–( अहिल्याबाई होळकराचे जीवनावर कादंबरी ) नयनतारा देसाई | ,, | ४०/– |
| 1. | Man In Love–( Bestseller–Non–fiction )– Nancy, Friday | £ | 1–25 |
| 2. | Inside RAW–the Story of India's secret service–Ashok Raina | Rs. | 35/– |
| 3. | Breakthroughs–( astonishing advance in your lifetime in medicine, science and technology )–Charles Panati | ,, | 59/– |

• For a wide range of books, join " Phoenix ! "

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

## पुणे वार्ता

पृष्ठ २ वरून

modern imagery च्या मागे लागून कवीनी तयार केलेल्या काही प्रतीकांमधून तर दुर्बोधता येतेच; पण हे दोन्हीही नसल तरी अनेक कविता बऱ्याच अंशी अनाकलनीय बनतात. याचं मुख्य कारण स्वच्छ अभिव्यक्तीचा अभाव हे असतं, असंही काही जणांनी मांडलं.

श्री. र. कृ. जोशीची ' दृश्य कविता ' किंवा ' मूर्त कविता ' हा प्रकारही या संदर्भात विचारात घेण्यासारखा आहे. शब्दांमधलं अंतर अक्षराच्या टाईपचं लहान–मोठेपण किंवा नुसत्या अवतरणामधून गुफलेली कविता ही या ' दृश्य कविते 'ची काही उदाहरणं. मानवी जीवनात सर्वंकष होऊ पहात असलेल्या तंत्रविज्ञानाचा हा उत्तम वापर आहे, अस मत या पद्धतीबाबत प्रा. स. शि. भावे यांनी व्यक्त केलं, तर दोन व्यक्तीमध्ये अंतर ठेवणं किंवा शब्दांचं कमी—जास्त महत्त्व दाखवण्यासाठी त्यांच्या टाइपामध्ये तसा फरक ठेवणं हे वाचकाला पंगू बनवणं आहे, असा आक्षेप श्री. म. गो. कुलकर्णी यानी घेतला.

स्वतः र. कृ. जोशी यानी याबाबतची स्वतःची भूमिका स्पष्टपणानं, एकही संधी न दवडता मांडली. तशा पद्धतीनं स्वतःच्या काही कविता वाचूनही दाखवल्या. त्यामध्ये वापरलेली तंत्रं आणि त्यांचे प्रयोजन स्पष्ट केलं; पण त्यामुळे प्रश्न सुटला नाही. शिवाय हे करत असताना जोशीचा आव एखाद्या क्षेत्रातील प्रस्थापिताविरुद्ध लढणाऱ्या क्रांतिकारकासारखा होता.

या ठिकाणी आणखी एक उदाहरण देण्यासारखे आहे. दोन–तीन वर्षांपूर्वी 'समव्यस्त' नावाचा एक काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यामध्ये त्या कवीनं (सुदैवानं नाव विसरलो.) तांबडे, पिवळे, पाढरे, निळे कागद चिकटवून दिले होते आणि हे रंगीबेरंगी कागद म्हणजेही कविताच आहेत असं तो हट्टानं सांगत होता.

हे दोन्हीही प्रयत्न आविष्काराचं तंत्र म्हणून उत्तम आहेत; पण ते एका परीनं संबधित कवीचा पराभवच उघड करतात. कारण आपल्याला जे सांगायचं आहे ते आपण साध्या सरळ शब्दात पारंपारिक पद्धतीनं सांगितलं तर आपल्यांकडे लोक लक्ष देतील का अशी भीती त्यांना वाटत असावी. त्यापेक्षा एखादी नवीच शक्कल लढवली आणि ती ' क्लिक ' झाली तर ' अभिव्यक्तीच्या नव्या पद्धतीचा जनक ' म्हणून आपला गौरव होईल आणि लोकांना ती रुचली नाही,त्यानी आपल्याला धुडकावून लावलं तर भवभूतिसारखं 'कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' म्हणत हौतात्म्य तरी मिळेल असा डाव यामागे असावा. शिवाय ही सर्व कसरत करत असताना,कवितेचा मूळ आशय त्यांच्या आणि वाचकांच्याही हातातून पाऱ्यासारखा निसटून जातो हा भाग वेगळाच. म्हणूनच जोशीच्या या पद्धतीवर चर्चासत्रासाठी आलेल्या एका भाषाशास्त्राच्या प्राध्यापकानी चागली कॉमेंट केली. ते म्हणाले, "जोशींची ही नवी शैली म्हणजे ॲडव्हर्टायझिंग फील्डचं काव्यावर झालेलं आक्रमण आहे." अर्थात याबाबत तुमच्या–आमच्यासारख्या निष्पाप जीवानी काही जरी म्हटलं तरी प्रा. भाव्यापासून फर्ग्युसनच्या 'साहित्य सहकार'चे सर्व कार्यकर्ते जोशीवर निहायत लुब्ध झाले होते, हे मात्र निश्चित; पण अशा कवीमुळे 'In the twentieth century, poetry will replace religion', हे मॅथ्यू अर्नोल्डचं भाकित खोटं ठरणार याबाबत सदेह राहात नाही आणि मग ' The world — without Marx without Christ ' हेच जास्त वास्तव वाटायला लागतं.

' कविता दशकाची ' या काव्यसंग्रहाच्या एकूण स्वरूपाबाबतही चांगली खमंग चर्चा झाली. प्रा. पराजपे यांनी संग्रहाच्या प्रारंभी म्हटल्याप्रमाणे हा संग्रह प्रातिनिधिक तर नाहीच; पण या दहा कवीपैकी किती कवी पुढील दशकात खरोखरच प्रभावी ठरतील, याबाबत अनेकांनी खाजगीमध्ये बोलताना शंका व्यक्त केली. संग्रहातल्या एकूण कवितांपैकी जेमतेम एकदशांश कविता लक्षात ठेवण्यासारख्या आहेत, असंही मत काही जणांनी व्यक्त केलं. मला वाटतं, 'दशकाची' असं म्हटल्यावर आमचे सगळे समीक्षक हादरले असावेत; पण आपण ' कविता दशकाची ' याचा अर्थ 'कविता दहाजणाची–दहा कवीची' असा घ्यायला काय हरकत आहे ?

संग्रहाच्या सपादकांच्या चर्चात्मक प्रस्तावनेवर संग्रहातलेच एक कवी अशोक बागवे यांनी जोरदार हल्ला चढवला. या प्रस्तावनेत मंगेश पाडगावकर आणि विजया राजाध्यक्ष यांच्या आवाजाखाली शिरीष पै, दया पवार आणि रमेश तेंडुलकर दबले गेल्यासारखे वाटतात, असा आरोपही श्री. बागवे यांनी केला.

मला स्वत.ला या संग्रहामध्ये दोन उणीवा जाणवल्या. एक म्हणजे सामाजिक आशय लाभलेल्या कविता या संग्रहात पाचसुद्धा नाहीत. प्रत्येक संग्रहात तशा काही कविता शोभेदाखल असल्याच पाहिजेत, असा माझा वैयक्तिक अजिबात आग्रह नाही; पण १९८० किंवा १९९० च्या दशकातली कविता अशा कवितांशिवाय फार फार अपूर्ण वाटेल.कारण नवनव्या सामाजिक जाणिवांबाबतच्या जागृतीचा हा काल आहे आणि सुदैवानं अनेक कवीच्या कवितांमध्ये त्यांचं प्रतिबिंब पडलेलं आहे–अगदी ज्याचा एकही काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेला नाही, अशांच्यासुद्धा. शिवाय यासाठी दलित कवीच्याच चोपडया धुंडाळण्याची गरज नाही. दुर्दैवानं दलित नसलेल्याही काही नव्या दमाच्या कवीनीही असा सामाजिक आशय आपल्या कवितांमधून उत्तम तऱ्हेने व्यक्त केलेला आहे. ' कविता दशकाची 'चे संयोजक आणि सपादक भरपूर कष्ट घेऊनही त्याच्यापर्यंत पचू शकले नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट !

संग्रहामध्ये दुसरी खटकणारी गोष्ट म्हणजे स्त्री-कवीचं अल्पसंख्याकत्व. संग्रहातल्या दहा कवीपैकी फक्त एक स्त्री-कवी आहे. बाकी सर्व नऊ पुरुष-कवी आहेत. दोन्ही बाजूनी मोजून पाच-पाचजण हवेत, असा आमचा आग्रह नाही, किमान इतका ढळढळीत असमतोल तरी नको होता. आता याबद्दल ' चागल्या स्त्री-कवी स पडल्याच नाहीत ', असं जर संयोजकाचं उत्तर असेल तर त्याना स्त्रियानीच उत्तर दिलं पाहिजे; पण स्त्री-कवीला ' कवयित्री ' म्हटल्याबद्दल चर्चासत्रात जोरदार आक्षेप घेणाऱ्या कवी रजनी परुळेकर यानाही ही गोष्ट खटकू नये, हे मात्र खेदजनक होतं.

—सतीश


विकलांगासाठीं आणि अपंगासाठीं पण
1981
नववर्षाच्या
शुभेच्छा
साकार करा
संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेनें १९८१ हे वर्ष आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष म्हणून जाहीर केले आहे.
आमसभेच्या या ठरावात जे उद्देश समोर ठेवण्यात आले आहेत त्याना भारत सरकारचा पाठिंबा आहे.
अधिक माहितीसाठीं, संपर्क करा.
समाज कल्याण मंत्रालय
भारत सरकार
शास्त्री भवन,
नवी दिल्ली-११०००१
davp 80/353